
ब्रेकअपच्या दाव्यांदरम्यान तारा सुतारियाची पहिली पोस्ट... (पान ६ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



सोफी डिव्हाईन 42 चेंडूत 95 धावा करून बाद, 8 षटकार मारले (पान ७ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatan@gmail.com सोमवार दिनांक १२ जानेवारी २०२६ अंक : १५९ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८


## महत्त्वाचे...

### भाजपची अवस्था 'पिंजरा' तील "मास्तरा'सारखी- जयंत पाटील



मुंबई - भाजपची अवस्था 'पिंजरा' चित्रपटातील मास्तराप्रमाणे झाली आहे. या चित्रपटात मास्तराला तमाशाचा इतका नाद लागला की मास्तरच तुणतुणे हातात घेऊन पुढे उभा राहायला लागला, अशी खोचक टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी केली आहे. "ये बंद करने आए थे तवायफो के कोठे, मगर सिक्को की खणक सुनकर खुद ही मुजरा कर बैठे,' अशा शेरोशायरीतून जयंत पाटलांनी भाजपला टोला लगावला. सांगलीत प्रचार सभेत ते बोलत होते. जयंत पाटील म्हणाले, भाजपचे ज्येष्ठ नेते दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी वेगवेगळ्या आघाड्या एकत्र करून सत्ता बनवण्याचे नाकारल्याचे उदाहरण आहे. मात्र आज भाजप काय करतोय? सगळे काँग्रेसमधील ओढून भाजपमध्ये नेले आहेत. आता आपले गडीदेखील तिथे चाललेत. काँग्रेस सर्वधर्मसमभावाचा विचार घेऊन चालते म्हणून तुम्ही साथ दिली. काँग्रेस सोडून जातीयवादी झेंडा घेण्यापूर्वी त्या व्यक्तीने दहा वेळा विचार करायला पाहिजे. जयंत पाटील म्हणाले, भाजपवाले सांगतात की ते हिंदुत्ववादी आहेत आणि अकोल्यात एमआयएमसोबत युती करतात.

### महापालिका निवडणुकांसाठी हिंगोली पोलिस दल सज्ज




मुंबई - महानगर पालिका निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी हिंगोली जिल्हा पोलिस दलातील 200 पोलिस कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून लवकरच हे कर्मचारी नियुक्तीच्या ठिकाणी रवाना होणार आहेत. राज्यात 29 महानगर पालिकांच्या निवडणुका होत असून यामध्ये कोकण, नाशीक, छत्रपती संभाजीनगर, पुणे, अमरावती, नागपूर विभागातील महानगर पालिकांचा समावेश आहे. या निवडणुकीत मतदान प्रक्रिया शांतेत पार पडावी तसेच कुठेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयातून पोलिस बंदोबस्त मागविण्यात आला आहे. या पोलिस बंदोबस्तासोबतच राज्य राखीव दलाचे जवान देखील तैनात केले जाणार आहेत. या महानगर पालिकांसाठी गुरुवारी ता. 15 रोजी प्रत्यक्ष मतदान होणार असून शुक्रवारी ता. 16 रोजी मतमोजणी होणार आहे. या पालिका निवडणुकीत मतदान कालावधीत तसेच मतमोजणीच्या वेळी कुठेही अनुचीत प्रकार घडू नये यासाठी पोलिस विभाग सतर्क झाला आहे. त्यासाठी स्थानिक पोलिस दला सोबतच इतर जिल्हयातील पोलिस कर्मचारी बंदोबस्तासाठी बोलावण्यात आले आहेत. त्यानुसार हिंगोली जिल्हयातील 200 पोलिस कर्मचारी पाठविले जाणार आहेत. यामधे जिल्हयातील सर्वच पोलिस ठाण्यांतर्गत काही कर्मचारी बंदोबस्तासाठी नियुक्त करण्यात आले आहेत.

# अरख्वी मुंबई, महाराष्ट्र विकायला काढलाय!

## मुंबई हातातून गेल्यास महाराष्ट्राचा झारखंड होईल, राज ठाकरेंचा सत्ताधाऱ्यांवर घणाघात

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- महाराष्ट्र आणि विशेषतः मुंबईच्या राजकीय इतिहासात आज सुवर्णक्षरांची नोंद होणार आहे. दादर येथील ऐतिहासिक शिवतीर्थावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची संयुक्त विराट जाहीर सभा आज होणार आहे. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी दोन्ही ठाकरे बंधू १९ वर्षांनंतर एकाच राजकीय मंचावरून मुंबईकरांना संबोधित करणार असल्याने संपूर्ण राज्याचे लक्ष या सभेकडे लागले आहे. या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी मुंबईच्या कानाकोपऱ्यातून कार्यकर्ते मोठ्या संख्येने दाखल होत आहेत.

दरम्यान, राज्यकर्त्यांचा मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव कसा आहे? याबाबत मी मुंबईतील प्रचार सभेत सांगणार असल्याचे राज ठाकरे यांनी याआधी अनेक मुलाखतींमध्ये सांगितले. त्यामुळे शिवाजी पार्कवरील या सभेत राज ठाकरे आज काय बोलणार? नेमके आपले काय म्हणणे मांडणार? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. तसेच राज्यकर्त्यांचेच उमेदवार बिनविरोध कसे निवडून येऊ शकतात, असा सवाल ठाकरे बंधुंनी उपस्थित केला होता. आज या मुद्द्यावर ठाकरे बंधू काही बोलणार का? हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

राज ठाकरे म्हणाले, मुंबई छत्रपती आंतरराष्ट्रीय विमानतळावरील डोमेस्टीक आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणे नवी मुंबईला नेणार. ही प्रोसेस हळूहळू सुरू झालेली आहे. पुढे धारावी लागून असलेले मुंबईचे संपूर्ण विमानतळ विकायला काढणार. शिवाजी पार्क मैदानाएवढी ५० ते ६० पार्क तिथे बसतील, एवढा प्लॉट आहे तो.

स्वकियांचा घात करणारी औलाद ही फक्त पक्षांमध्ये नसते. राजकीय पक्षांमध्ये




आल्याचे मला कळलंय. सत्ता डोक्यात गेलीये. हा भूगोल नीट समजून घ्या. वाढवण बंदाराला लागून लगेच गुजरात आहे. मुंबई गुजरातला न्यायची यांच्या पहिल्यापासून डोक्यात आहे. मुंबई गुजरातला नेण्यासाठी पालघर जिल्हा ताब्यात घ्यावा लागेल, ठाणे जिल्ह्याचा भाग, एमएमआर रिजनचा भाग ताब्यात घ्यावा लागेल. तर मुंबईपर्यंत पोहोचता येईल. पैसे बदाबद टाका, मतदारसंघ फोडा, मराठी माणसांना फोडा, मतदारसंघ ताब्यात घ्या आणि नंतर सांगा खासदार, आमदार, नगरसेवक आमचाच. महापालिका आमच्याच ताब्यात. हे सगळे करून मुंबई गुजरातला कशी जोडता येईल, यासाठी हे सगळे लाँगटर्म प्लॅन सुरू आहे. आम्ही बेसावध. जातीपातीत भांडणे लावली जात आहेत.एकदा मुंबई हातातून गेली, तर महाराष्ट्र झारखंडपेक्षा वेगळा करणार नाही. मुंबई ही तुमची राजधानी आहे, ताकद आहे. पण त्यांच्या अंगात जो मस्तवाल पणा आहे, की आम्ही काहीही करू, कुठूनही मते आणू. जे यांनी विधानसभेला केले, तेच आताही करण्याचा प्रयत्न करणार, असा आरोप राज ठाकरे यांनी केला.

## घराचं बांधकाम सुरु असताना अचानक तांब्याचं भांडं सापडलं, उघडताच साऱ्यांना धक्का, मोठ्ठा खजिना सापडला

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

बंगळुरु: कर्नाटकातील गडग जिल्ह्यात घराचा पाया खोदताना जमिनीखाली सोन्याचा खजिना सापडला आणि परिसरात एकच गोंधळ उडाला आहे. घरासाठी खोदकाम करताना कामगारांना सोन्याचे दागिने असलेले तांब्याचे भांडे सापडले. भांडे उघडताच, त्यांना 22 मौल्यवान सोन्याच्या वस्तू सापडल्या आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला.

याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, गडगमधील



लक्कुंडी गावात ही घटना घडल्याची माहिती आहे. कामगार खोदकाम करत असताना, त्यांना मातीत गाडलेले एक जुने तांब्याचे भांडे सापडले. घटनास्थळी उपस्थित असलेल्या आठवी इयत्तेतील विद्यार्थी प्रज्वलला सर्वप्रथम ते भांडे दिसले. त्याने ते उघडताच, त्याला आत सोन्याचे हार, कानातले आणि इतर दागिने दिसले.

प्रज्वलने याप्रकरणाची माहिती तात्काळ गावातील मोठ्यांना दिली. ही बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली आणि मोठ्या संख्येने लोकांनी घटनास्थळी गर्दी करण्यास सुरुवात केली. माहिती मिळताच प्रशासन आणि पोलिस अधिकारीही घटनास्थळी पोहोचले. सोन्याचे दागिने 700 ग्रॅमपेक्षा जास्त वजनाचे आहेत. गंगाव्वा बसवराज रिट्टी नावाच्या व्यक्तीच्या घरी हे दागिने सापडले.

## मुंबई झोपडपट्टी मुक्त करणार:बेस्ट बसच्या तिकीटात महिलांना ५० टक्के सूट; महापालिकेसाठी महायुतीचा वचननामा जाहीर

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई महापालिकेसाठी महायुतीकडून वचननामा जाहीर करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच भाजप व शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी मुंबईमधल्या मराठी माणसांसाठी तसेच येथील गिरणी कामगारांसाठी हक्काचे घर तयार करणार असल्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच लाडक्या बहिणींना बेस्ट बसच्या तिकीटात 50 टक्के सूट देण्याचे आश्वासन महायुतीच्या वचननाम्यातून देण्यात आले आहे.पत्रकार परिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबईत असलेल्या मराठी माणसाच्या हिताचे आणि मराठी भाषेचे रक्षण करणे आणि वाढवणे ही आमची जबाबदारी आहे आणि आमचे वचन देखील आहे. तसेच मुंबईच्या बाहेर गेलेला मराठी माणूस हा मुंबईच्या बाहेर गेला, याला जबाबदार कोण? मुंबईत मराठी माणसाला परत आणण्याची



देखील आमची जबाबदारी आहे.पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, महायुती सरकारने मोठे निर्णय घेतले आहेत. 20 हजार इमारतींना ओसी देण्याचा निर्णय आम्ही घेतला असून याची अंमलबजावणी पुढील एक वर्षात केली जाईल. झोपडपट्टी मुक्त मुंबई हे शिवसेना प्रमुखांचे स्वप्न होते. 40 लाख लोकांना घर देणे. परंतु, मागच्या अनेक वर्षात काहीच झाले नाही. वारसा सांगणाऱ्यांची ती जबाबदारी होती. परंतु आता आम्ही ते पूर्ण करणार आहोत. सुनियोजित मुंबईचा विकास करण्याचे आमची जबाबदारी असून ती आम्ही या वचननाम्यातून करणार आहोत. गिरणी कामगारांना हक्काचे घर देण्याचे आम्ही काम सुरू केले आहे.

## गोरेगावात भाजप-मनसे कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा

### प्रचाराच्या टेबलवरुन वाद, मनसे कार्यकर्ता जखमी झाल्याने तणाव वाढला

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार आता शेवटच्या टप्प्यात आला असून, राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. एकीकडे ठाकरे बंधू प्रत्यक्ष मैदानात उतरून सभांचा धडाका लावत असताना, दुसरीकडे कार्यकर्त्यांमधील संघर्ष आता चव्हाट्यावर येऊ लागला आहे. मुंबईच्या गोरेगाव पश्चिम परिसरात आज भाजप आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाल्याची घटना घडली. प्रभाग क्रमांक ५८ मधील अमृत नगर भागात



प्रचाराचे टेबल लावण्यावरून सुरू झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोरेगाव पश्चिमेकडील अमृत नगर परिसरात आपापल्या पक्षाचे प्रचार साहित्य आणि टेबल लावण्यावरून भाजप आणि मनसेच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक चकमक सुरू झाली. मात्र, काही वेळातच या वादाने उग्र रूप धारण केले आणि दोन्ही गटांचे कार्यकर्ते एकमेकांमध्ये भिडले. या धुमश्चक्रीत दोन्ही बाजूंनी जोरदार घोषणाबाजी आणि धक्काबुक्की करण्यात आली. या हाणामारीत मनसेचा एक कार्यकर्ता गंभीर जखमी झाला असून, त्याला उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच गोरेगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तातडीने अमृत नगर भागात धाव घेतली.

पोलिसांनी मध्यस्थी करत दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांना पांगवले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र, या राड्यामुळे गोरेगाव परिसरात मोठी राजकीय खळबळ उडाली असून, दोन्ही पक्षांचे पदाधिकारी पोलिस ठाण्याबाहेर जमा झाले आहेत.

## शहराच्या पाणी योजनेची फाइल २ . ५ वर्षे कमिशनसाठी मातोश्रीवर- सावे उद्धव ठाकरेंमुळे शहराला विलंबाने पाणी मिळत असल्याचा आरोप

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई शहरासाठी केवळ ५५ दिवसांत २०१९ मध्ये १६८० कोटींची पाणीपुरवठा योजना मंजूर केली. निविदा प्रक्रिया अंतिम होऊन कार्यारंभ आदेशही मिळाले होते. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी टक्केवारीसाठी फाइल मातोश्रीवर अडीच वर्षे प्रलंबित ठेवली. पाणीपुरवठा विभाग, पालकमंत्री ते मातोश्री अशी फाइल फिरत राहिली. अडीच वर्षे पाणीपुरवठा योजनेचे काम प्रलंबित राहिल्याने शहराला पाणी मिळू शकले नाही, असा आरोप राज्याचे बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केला. भाजप-शिवसेना युतीचे सरकार



२०२२ मध्ये आल्यानंतर नव्याने पाणीपुरवठा योजनेच्या कामाला गती मिळाली. केंद्राचा एक हजार कोटींचा हिस्सा प्राप्त झाल्याने आता २७४० कोटींवर योजना गेल्याचे सावे यांनी स्पष्ट केले. शहराला तीन महिन्यांत पाणी मिळणार असल्याचा पुनरुच्चारही केला.

'दिव्य मराठी'च्या वतीने आयोजित "नेताजी इन न्यूजरूम' कार्यक्रमात अतुल सावे यांनी शनिवारी (१० जानेवारी) हजेरी लावली. विधानसभा निवडणूक २०१९ नंतर उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. त्यांनी शहराच्या पाणीपुरवठा योजनेची वर्कऑर्डर थांबवली. संपलेली पाणीपुरवठा योजना फडणवीस यांनी पुन्हा सरकार आल्यानंतर नव्याने बैठक घेत युद्धपातळीवर सुरू केली. आता योजनेचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. ३७०० हॉर्स पॉवरची चाचणी यशस्वी झाली. शहराच्या विकासासाठी भाजप कटिबद्ध असल्याचे सावे यांनी स्पष्ट केले. शहरासाठी ६५० कोटींचे रस्ते, २३० कोटी कचरा नियोजन आणि २७४० कोटी पाण्यासाठी प्राप्त झाले.

## 'लाडकी बहीण' योजनेचा हप्ता लांबणीवर पडणार ?

### अजित पवार म्हणाले - निवडणूक आयोगाने सांगितल्यास 16 तारखेला पैसे देणार


**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई -मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात संघर्षाचा केंद्रबिंदू ठरली आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, मकर संक्रांतीपूर्वी डिसेंबर आणि जानेवारीचे एकत्रित ३००० रुपये बहिणींच्या खात्यात जमा करण्याच्या हालचाली सत्ताधाऱ्यांनी सुरू केल्या होत्या. मात्र, काँग्रेसने यावर आक्षेप घेत निवडणूक आयोगाला पत्र लिहिले असून, १४ जानेवारीनंतरच हे पैसे देण्यात यावेत अशी मागणी केली आहे. यावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी सामंजस्याची भूमिका घेतली आहे. "जर निवडणूक आयोगाने सांगितले, तर आम्ही लाडकी बहीण योजनेचा हप्ता १६ जानेवारीला देऊ," असे स्पष्टीकरण त्यांनी पत्रकारांशी बोलताना दिले.

लोकसभा निवडणुकीनंतर महायुतीला विधानसभा निवडणुकीत सत्तेत येण्यासाठी गेमचेंजर ठरलेली ही योजना आता महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचे मुख्य हत्यार बनली आहे. भाजप नेते गिरीश महाजन आणि मुंबईतील उमेदवार तेजस्वी घोसाळकर यांनी दोन महिन्यांचे हप्ते एकत्र देण्याबाबत समाजमाध्यमांवर पोस्ट शेअर केल्या होत्या. याला काँग्रेसने 'निवडणूक आचारसंहितेचा भंग' असल्याचे मानत विरोध दर्शवला आहे. यासंदर्भात काँग्रेसने निवडणूक आयोगाला पत्र लिहिले असून, आपण योजनेच्या विरोधात नसून, केवळ निवडणुका संपेपर्यंत हप्ता न देण्याची विनंती केली आहे. या राजकीय पेचप्रसंगामुळे आता लाडक्या बहिणींच्या हप्त्याबाबत निवडणूक आयोग काय निर्णय घेते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवारांचा उल्लेख 'रॉकी भाई' असा केला होता. यावर अजित पवार यांनी आपल्या खास शैलीत मिश्किल उत्तर दिले आहे. "मी अद्याप केजीएफ सिनेमा पाहिलेला नाही. आधी मी तो चित्रपट पाहतो आणि मगच ठरवतो की रोहितने मला 'रॉकी भाई' म्हटले ते योग्य आहे की अयोग्य," असे दादांनी हसत हसत सांगितले.

महायुतीमधील अंतर्गत वादावर बोलताना अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही प्रत्युत्तर दिले. "मी इथे महापालिकेची निवडणूक लढवत आहे, मग मी प्रशासनातील चुका दाखवल्या म्हणजे युती धर्म पाळला नाही




असे होते का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'आता कुठे कंठ फुटला' या विधानाचा समाचार घेताना अजित पवार म्हणाले की, जर गेल्या नऊ वर्षांपासून निवडणुकाच झाल्या नसतील, तर जनतेच्या समस्या मांडण्यासाठी कंठ फुटणारच ना? महापालिका निवडणुकांच्या तोंडावर महायुतीतील नेत्यांमधील हे शाब्दिक युद्ध आता विकोपाला पोहोचल्याचे दिसत आहे.

आमदार महेश लांडगे यांच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नावर अजित पवार म्हणाले, "महेश लांडगे हा खूप मोठा नेता आहे.

१ २ ३ ४ ५ ६

यवतमाळ...

## बस चालकांवर ताण; नादुरुस्त रस्त्याने वर्षभरात 60 अपघात



यवतमाळ -सामान्य नागरिकांचा सुरक्षित प्रवासाचा विश्वास असलेली राज्य परिवहन महामंडळाची सेवा यवतमाळ विभागात मात्र अपघातांच्या विळख्यात सापडल्याचे चित्र समोर आले आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२५ या एका वर्षाच्या कालावधीत एसटीच्या ६० अपघातांमध्ये ११ प्रवाशांचा मृत्यू, तर ६२ जण जखमी झाल्याची नोंद आहे. या अपघातांमुळे महामंडळाला ही लाखो रुपयांचे नुकसान सहन करावे लागले आहे. सध्या एसटीतर्फे रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात येत असून चालक व कर्मचाऱ्यांना अपघात मुक्त प्रवासाबाबत मार्गदर्शन केले जात आहे. मात्र, प्रत्यक्षात अपघातांची मालिका थांबत नसल्याने 'लालपरी'च्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. ग्रामीण व शहरी भागातील प्रवाशांचा आजही मुख्य आधार असलेली एसटी अनेकांसाठी जीवघेणी ठरत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. यवतमाळ राज्य परिवहन विभागांतर्गत यवतमाळ, पुसद, वणी, नेर, राळेगाव, उमरखेड, दारव्हा, पांढरकवडा आणि दिग्रस अशी एकूण ९ आगार कार्यरत आहेत. या आगारांतून दररोज शेकडो बसेस धावतात. मात्र, खराब रस्ते, वाढती वाहतूक, चालकांवरील मानसिक ताण, रात्रपाळी व ओव्हरटाइम ड्युटी यामुळे अपघातांची संख्या वाढत असल्याचे एसटी प्रशासनाचे म्हणणे आहे. मागील काही वर्षांची आकडेवारी पाहता अपघातांचे प्रमाण सातत्याने वाढत असल्याचे स्पष्ट होते.

## 36 शिक्षकांची 7.43 कोटींची फसवणूक





यवतमाळ -शिक्षकांना जादा परताव्याचे आमिष दाखवून तब्बल ७ कोटी ४३ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी गिरीश किसनराव दुधे रा. कॉलेज नगर, दिग्रस व विनोद किसनराव दुधे रा. बापूनगर, दिग्रस या दुधे बंधूंवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणात आतापर्यंत ३६ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून दोन्ही आरोपी सध्या पोलिस कोठडीत आहेत. आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली होती. अटकेनंतर आरोपींना न्यायालयात हजर केले असता प्रथम ९ जानेवारीपर्यंत तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. आरोपींना दारव्हा सत्र न्यायालयात पुन्हा हजर करण्यात आले असता, न्यायालयाने १३ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडीत वाढ दिली आहे.या प्रकरणात पोलिसांनी पोलिस कोठडीदरम्यान आरोपींकडून महत्त्वाची कागदपत्रे, आर्थिक व्यवहारांचे पुरावे, बँक खात्यांची माहिती तसेच अन्य दस्तऐवज जप्त करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.
या प्रकरणात आतापर्यंत ३६ शिक्षकांनी तक्रारी दाखल केल्या असून, फिर्यादी व साक्षीदारांच्या जबाबांनुसार गुन्ह्यांची संख्या वाढविण्यात आली आहे. या गंभीर आर्थिक गैरव्यवहाराच्या एमपीआयडी अंतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नागरिकांना त्रास होणार नाही, हॉकर्सवर अन्याय होणार नाही

## केंद्रीय मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांनी दिला विश्वास, दक्षिण व मध्य नागपुरातील उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर - मध्य व दक्षिण नागपुरात पूर्वी खूप समस्या होत्या. आज संपूर्ण चित्र बदलले. रस्ते झाले, उड्डाणपूल झाले, चोवीस तास पाणी पुरवठा सुरू झाला. आज अगदी किरकोळ समस्या शिल्लक आहेत. त्या देखील काही दिवसांत दूर होतील. अनेक विकासकामे सुरू आहेत. पण नव्या विकास प्रकल्पांमध्ये सर्वसामान्य नागरिकांना त्रास होणार नाही आणि हॉकर्सवर अन्याय होणार नाही, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांनी दिला. दक्षिण व मध्य नागपुरातील भाजप-महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ना. श्री. गडकरी बोलत होते.









प्रभाग क्रमांक ३४, ३०, ३२ आणि १८ येथील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ अमर नगर, अयोध्यानगर तसेच महाल येथे ना. श्री. नितीन गडकरी यांच्या जाहीर सभा झाल्या. नागेश मानकर, मनीषा नगरधनकर, मंगला खेकरे, बाबाराव तायडे, पायल कुंदेलवार, चंदन आगरे, अजय खळतकर, स्नेहल बिहारे, गुणप्रिया शेंडे, रितेश पांडे, रुपाली ठाकूर, राम कुंभलकर, सुधीर (बंडू) राऊत, सारिका नांदूरकर, वैशाली उदापूरकर, सचिन नाईक या उमेदवारांच्या प्रचारार्थ ना. श्री. गडकरी यांच्या सभा झाल्या. यावेळी आमदार मोहन मते, मुधोजी राजे भोसले आदींची उपस्थिती होती.

दक्षिण नागपुरातील सभांमध्ये बोलताना ना. श्री. गडकरी म्हणाले, कोणती कामे केली आहेत, हे सांगण्याची यंदाच्या निवडणुकीत गरज नाही. प्रत्येक काम लोकांच्या पुढे आहे. आम्ही जे बोललो, ते करून दाखवले आणि जे काम केले, तेच बोलतो. या भागात अनधिकृत ले-आऊट मोठ्या प्रमाणात होते. पण आम्ही निवडून आल्यावर या ले-आऊट्सची जबाबदारी घेतली. सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या. आज चोवीस तास पाण्याची व्यवस्था आहे. उत्तम रस्ते झाले. उद्यानांमध्ये चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. १३५ सिटर बस रिंग रोडवर धावणार आहे. ५२ किलोमीटरचा प्रवास ही बस करेल. या भागात पूर्वी फिरणे अत्यंत अवघड होते. मी स्वतः स्कुटरवर फिरायचो तेव्हा रस्ते अत्यंत खराब होते. आज सर्व सुविधा झाल्या आहेत. त्यामुळे या भागात राहायला येणाऱ्यांची संख्या गेल्या दोन दशकांमध्ये वाढली. हे सारे सर्वसामान्य जनतेमुळे शक्य होऊ शकले. त्यामुळे विकासाचे श्रेय जनतेलाच आहे, असे ना. श्री. गडकरी म्हणाले.

महाल येथील सभेत ना. श्री. गडकरी म्हणाले, 'माझ्या जीवनाची सुरुवात या भागातून झाली आहे. प्रत्येक भाग माझ्या परिचयाचा आहे. प्रत्येक गोष्टीशी माझा जवळून संबंध आहे.

हा भाग खूप बदलला, याचा मला आनंद आहे. कल्याणेश्वर मंदिरासाठी १६० कोटींची योजना तयार आहे. गजबजलेल्या परिसरातून १२०० कोटी रुपयांचा उड्डाणपूल तयार होत आहे. या पुलावरून थेट ताजबागच्या पलीकडे जाता येणार आहे.'

# ...तर घरावर बुलडोजर चालणार; असदुद्दीन ओवैसींनी मुस्लिम समुदायाला केलं अलर्ट

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी



नागपूरः प्रत्येक समाजाचे-धर्माचे स्वतःचे राजकीय प्रतिनिधित्व आहे. मात्र, मुस्लिम समुदाय केवळ मतदार होऊन राहिला आहे. यापुढेही तुम्ही केवळ मतदार बनून राहाल तर तुमच्या घरावर बुलडोजर चालणार हे निश्चित आहे', असे वक्तव्य एआयएमआयएमचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी शनिवारी केले.

मुस्लिमाच्या राजकीय प्रतिनिधित्वावर बोलतान ते म्हणाले, 'भारत आणि महाराष्ट्रात प्रत्येक धर्माचे राजकीय प्रतिनिधित्व आहे. पण, मुस्लिमांचे नाही. ही निवडणूक आपल्या धर्माचे राजकीय नेतृत्व उभे करण्याची चांगली संधी आहे. केवळ मतदार बनून राहाल तर तुमच्या घरावर बुलडोजर चालणार, मुस्लिम युवकांवर खोटे आरोप लावून तुरुंगात डांबले जाईल, शिक्षणापासून वंचित ठेवण्यात येईल तसेच तुम्हाला कधीही सन्मान मिळणार नाही. मुस्लिमांना जाणीवपूर्वक टार्गेट केल्या जात असून त्यांना आपल्या जीवनाची कुठलीही किंमत यांना नाही.

त्यामुळे स्वतःचे राजकीय प्रतिनिधित्व उभे करा. आपल्या मतदानाचा हक्क बजावत मुस्लिम समाजातील चांगल्या नेतृत्वाला निवडून द्या.'

भाजपची टीम बी असल्याचे आरोप झिडकारत ते म्हणाले, 'मी विरोधकांच्या आरोपांना उत्तर देऊन थकलो आहे. वास्तविक पाहता, आम्ही बिहारमध्ये भाजपला हरविण्यासाठी पाच जागा मागितल्या होत्या.

पण, काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांनी आम्हाला पाच जागा दिल्या नाहीत. प्रत्येक वेळी निवडणूक आली की सेक्युलरिजम धोक्यात असल्याचा नारा देण्यात येतो. हा नारा देणारे लोक सर्वाधिक धोकादायक आहेत. त्यांनी सातत्याने मुसलमानांचे नेतृत्व संपविण्याचा प्रयत्न केला आहे. आमची मुले जेव्हा तुरुंगात वर्षानुवर्षे सडतात तेव्हा यांचा सेक्युलरिजम कुठे जातो, याचे उत्तर त्यांनी द्यायला हवे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अजित पवार, एकनाथ शिंदे, नितीश कुमार, चंद्रबाबू नायडू यांना सोबत घेऊन वक्फविरोधी कायदा आणला आहे. जेव्हा यावर संसदेत चर्चा झाली होती तेव्हा मी मोदी सरकारचे मनसुबे उघड केले होते.

या कायद्याच्या आधारे आपल्या वक्फच्या जागा हडपण्यात येतील किंवा त्यांचे अस्तित्व संपविण्यात येईल, अशी भीती खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी व्यक्त केली. 'अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पच्या भारतविरोधी धोरणांवर मोदी आणि भाजपचे तोंड उघडत नाही.

ज्या चीनने ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानला मदत केली, त्यांना आज आपण रेड कार्पेट घालून गुंतवणुकीचे आमंत्रण देतोय. ही भाजपची स्थिती आहे', असे ते म्हणाले

# प्रेमसंबंधातून टोकाची हिंसा; नागपुरात भरदिवसा अल्पवयीन बहीण-भावावर प्राणघातक हल्ला

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी



नागपूर : नागपूर शहरात पुन्हा एकदा प्रेमसंबंधांच्या वादातून टोकाची आणि भयावह हिंसा समोर आली आहे. यशोधरा नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिवळी नदी परिसरात अल्पवयीन मुलगी आणि तिच्या भावावर चाकूने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रेमसंबंधांतील असहिष्णुता आणि वाढती हिंसा हा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुणाल संतापे (रा. यशोधरा नगर) असे आरोपीचे नाव असून तो पीडित अल्पवयीन मुलीच्या शेजारी राहत होता. पूर्वी आरोपी आणि मुलगी यांच्यात ओळख होती. मात्र कुटुंबीयांच्या हस्तक्षेपानंतर मुलीने आरोपीपासून स्पष्टपणे अंतर ठेवले होते. याच गोष्टीचा राग आणि संशय आरोपीच्या मनात साचत गेला. मुलीचे इतर कोणासोबत संबंध असल्याचा संशय त्याने डोक्यात धरला आणि त्यातूनच ही भीषण घटना घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

घटनेच्या दिवशी आरोपीने आधी मुलीच्या भावाशी वाद घातला. सुरुवातीला शाब्दिक वाद झाला, मात्र काही क्षणातच हा वाद हिंसक झाला. संतापाच्या भरात आरोपीने चाकू काढून मुलीच्या भावावर वार केले. अचानक झालेल्या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला. भावाला वाचवण्यासाठी मध्ये पडलेल्या अल्पवयीन मुलीवरही आरोपीने निर्दयपणे चाकूचे वार केले. काही क्षणांतच संपूर्ण परिसर रक्तरंजित झाला.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत जखमी भावंडांना मेयो रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघांची प्रकृती गंभीर होती, मात्र वेळेवर उपचार मिळाल्याने सध्या त्यांची स्थिती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान, घटनेनंतर फरार झालेल्या आरोपीचा यशोधरा नगर पोलिसांनी वेगाने शोध घेतला. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीद्वारे काही तासांतच आरोपीला अटक करण्यात आली. पोलिसांनी आरोपीकडून हल्ल्यासाठी वापरलेला चाकूही जप्त केला आहे.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधानातील कलम ३०७ सह इतर गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. सध्या आरोपीची कसून चौकशी सुरू असून, या घटनेमागील सर्व बाजू तपासल्या जात आहेत.

# नागपूरच्या रणधुमाळीतील 'लढवय्या' माता

## एका महिन्याच्या बाळासह भाजप उमेदवाराकडून प्रचाराचा झंझावात, मतदारांसह विरोधकही थक्क

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर:राजकारणात संघर्षाच्या अनेक कथा आपण ऐकतो, मात्र नागपूर महानगरपालिका निवडणुकीच्या मैदानात एका मातेच्या जिद्दीची अनोखी गोष्ट सध्या संपूर्ण शहरात चर्चेचा विषय ठरली आहे. प्रभाग ३० मधील भाजपच्या उमेदवार पायल कुंदेलवार या आपल्या अवघ्या एक महिन्याच्या चिमुकलीला, शर्वरीला कडेवर घेऊन प्रचाराच्या मैदानात उतरल्या आहेत. मातृत्व आणि कर्तव्य यांची एक आगळीवेगळी सांगड घालत त्यांनी सुरू केलेला हा प्रवास पाहून मतदार आणि विरोधकही थक्क झाले आहेत.

निवडणुकीची घोषणा झाली आणि त्याच सुमारास पायल यांना मातृत्वाचा आनंद मिळाला. मात्र, बाळंतपणानंतर विश्रांती घेण्याऐवजी त्यांनी पक्षाने दिलेली जबाबदारी आणि जनसेवेचा वसा पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. नागपूरच्या तापलेल्या वातावरणात आणि प्रचाराच्या धबडग्यात पायल यांची मोठी ओढाताण होत आहे. कधी त्या आपल्या बाळाला गाडीत सुरक्षित ठेवून चौकसभा आटोपतात, तर कधी बाळ कडेवर असतानाच मतदारांच्या गाठीभेटी घेतात. त्यांच्या चेहऱ्यावरील हसू आणि कामाप्रती असलेली निष्ठा कार्यकर्त्यांमध्येही नवा उत्साह भरत आहे.

भाजप स्त्रियांना कमकुवत मानत नाही - पायल कुंदेलवार

आपल्या या आव्हानात्मक प्रवासाबद्दल बोलताना पायल कुंदेलवार भावूक होतात. त्या सांगतात की, मातृत्वाचा आनंद आयुष्यात सर्वोच्च आहेच, पण समाजाने आणि पक्षाने माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, तो सार्थ ठरवणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे. भाजप हा असा पक्ष आहे जो स्त्रियांना कधीच कमकुवत मानत नाही. नऊ महिने गरोदर असतानाही मी प्रभागात सक्रियपणे काम केले आहे आणि आता माझी मुलगी शर्वरी ही देखील माझ्या या राजकीय प्रवासातली सर्वात लहान पण महत्त्वाची सोबती बनली आहे.

एक महिन्याच्या लहान बाळाला घराबाहेर नेणे हे कोणत्याही मातेसाठी जिकिरीचे काम असते. या कसरतीत पायल यांना त्यांच्या कुटुंबाची मोठी साथ मिळत आहे. जेव्हा जास्त वेळ बाहेर फिरायचे असते, तेव्हा त्या बाळाला कारमध्ये सोबत नेतात, जेणेकरून तिला तिथे शांत झोप मिळेल आणि तिचे दूध वेळेवर होईल. या प्रवासात त्यांचे पती, आई आणि सासूबाई त्यांची मोठी ताकद बनून उभे आहेत. आपण जेव्हा जनसेवेसाठी बाहेर असतो, तेव्हा हे सर्वजण शर्वरीला जिवापाड जपतात, म्हणूनच आपण निश्चिंतपणे मतदारांपर्यंत पोहोचू शकतो, असे पायल कुंदेलवार आवर्जून नमूद करतात.

प्रभाग ३० मधील नागरिकही पायल कुंदेलवार यांच्या या धडपडीचे मोठे कौतुक करत आहेत. एका हातात राजकारण आणि दुसऱ्या हातात पाळणा अशा अनोख्या स्वरूपात सुरू असलेला हा प्रचार सध्या नागपुरात आकर्षणाचे केंद्र ठरला आहे. स्वतःच्या सुखसोयींचा विचार न करता चिमुकल्या बाळासह मतदारांच्या दारापर्यंत पोहोचणाऱ्या या 'लढवय्या' मातेच्या पदरात आता नागपूरची जनता विजयाचे दान टाकणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.



## आजची युवा पिढी...

जगातील सर्वात तरुण जन देश जर कोणता असेल तर तो आपला भारत देश आहे. आज आपल्या देशाची लोकसंख्या १४४ कोटी इतकी आहे. आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकसंख्या ही १८ ते ४० या वयोगटातील आहे. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. देशाचे भविष्य याच तरुणांवर अवलंबून आहे. याच तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. तरुणच आपल्या देशाचे भाग्यविधाते आहेत असे ते म्हणत. या तरुणांकडे असलेल्या ऊर्जेचा उपयोग देशकार्यासाठी करुन घ्यावा असे त्यांचे मत होते. पण आज तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत. सर्वात मोठे आव्हान आहे ते बेरोजगारीचे. आजचे तरुण उच्चविद्याविभूषित आहेत. हुशार आहेत. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात आजचे तरुण अग्रेसर आहेत. देशासाठी काहीतरी करुन दाखवण्याची जिद्द त्यांच्याकडे आहे. शिक्षण आणि काम करण्याची उर्मी असूनही त्यांच्या हाताला रोजगार नाही. पदव्यांचे भेंडोळे घेऊन तरुण जागोजागी फिरत आहेत मात्र त्यांना नोकरी मिळत नाही. सरकारी नोकर भरती बंद आहे. खाजगी क्षेत्रात नोकरी मिळत नाही. ज्यांना आहे त्यांना नोकरी टिकवणे मुश्किल झाले आहे. स्वतःचा व्यवसाय, उद्योग करायचा म्हटले तर भांडवल नाही. शेतीही बेभरवशाची झाली आहे त्यामुळे आजचे तरुण हताश झाले आहेत. या हताश तरुणांना धीर देऊन त्यांना रोजगार देण्याऐवजी राजकीय नेते त्यांना पकोडे विका असे म्हणून त्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. रोजगार नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड निराशा पसरली आहे. नैराश्यातून काही तरुणांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी गेले आहेत. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण रोजगार नसल्याने आपले जीवन अकाली संपवत आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी जात आहेत हे पाहून मन खिन्न होते. रोजगार मिळत नसल्याने तरुणांच्या मनात व्यवस्थेविरुद्ध सुप्त असंतोष आहे. या असंतोषाचा भडका होण्याआधीच सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी ठोस धोरण आखावे. जर या तरुणांच्या मनातील असंतोषाचा भडका झाला तर भल्याभल्यांना पळता भुई थोडी होईल. सध्याच्या बेरोजगारीचा दर हा मागील ४५ वर्षातील सर्वात जास्त आहे ही बाब आपल्या देशाला भूषणावह नाही. हा दर कमी करण्यासाठी आणि तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी सरकार काही ठोस प्रयत्नही करताना दिसत नाही. या तरुणाईचा वापर केवळ मते मिळवण्यासाठीच केला जात आहे असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. तरुणांच्या हाताला काम मिळणे ही काळाची गरज आहे कारण तरुणांच्या हाताला काम मिळाले नाही तर तरुणाई भरकटण्याची शक्यता अधिक आहे. त्यांच्या शिक्षणाचा, त्यांच्यातील ऊर्जेचा समाजाला, देशाला उपयोग होण्याऐवजी ती ऊर्जा वाया जाण्याचीच शक्यता अधिक आहे. या तरुणांच्या शिक्षणाचा व ऊर्जेचा देशकार्यासाठी उपयोग व्हायला हवा. त्यांचा उपयोग जर देशकार्यासाठी झाला तर आपल्याला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. आजची तरुणाई हीच आपली शक्ती आहे. या शक्तीचा वापर व्हायला हवा. जगात सर्वात जास्त तरुण भारतात आहे. जगात चिननंतर सर्वात जास्त लोकसंख्या भारतात आहे. खरंतर याला समस्या न मानता संधी मानली पाहिजे. या संधीचे सोने करुन तरुणांच्या हाताला रोजगार दिल्यास भारत महासत्ता बनेल यात शंका नाही. आजच्या तरुणांना जग सुंदर शांत असावे असे वाटते. गरिबी, भ्रष्टाचार त्यांना नको आहे. प्रजासत्ताक राष्ट्रावर त्यांची निष्ठा आहे. आपण समोरच्याला समजून न घेता त्याचा दुस्वास कसा करू शकतो? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे ते सतत प्रयत्न करीत असतात. त्यांना एक स्थिर व सुरक्षित अर्थव्यवस्था हवी आहे. आपल्या आजूबाजूच्या परिसराबाबत ते तितकेच जागृत असतात.संपत्ती कधीतरी संपून जाईल त्यामुळे तिचा जपून वापर करण्यास ते प्राधान्य देतात. थोडक्यात सांगायचे तर आजचा तरुण जबाबदार आहे. तो आपल्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत आहे. याचवेळी पैशापेक्षा आनंद महत्वाचा असल्यामुळे तो आपल्या आवडीनुसार करियर निवडण्यास प्राधान्य देतोय त्यामुळे आपण जे काही काम करीत आहे त्यासाठी लोकांनी आपल्याकडे मानाने पहावे अशी त्यांची इच्छा आहे. आपल्या देशातील ६९ टक्के तरुणांना ठाम विश्वास आहे की पैसे त्यांच्यासाठी आनंद विकत आणू शकत नाही तर ८० टक्के तरुणांना पैशापेक्षा कला, ७९ टक्के तरुणांना पैशापेक्षा शिक्षण आणि ७६ टक्के तरुणांना पैशापेक्षा यश महत्वाचे वाटते.

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे


# युवकांचे प्रेरणास्रोत : स्वामी विवेकानंद

भारतभूमीच्या वैचारिक आकाशात जे काही तेजस्वी नक्षत्रे उदयाला आली, त्यांपैकी स्वामी विवेकानंद हे एक अतुलनीय नाव आहे. केवळ एका व्यक्तीचे नाव नव्हे तर जागृत चेतनेचा, आत्मविश्वासाचा आणि राष्ट्रोद्धाराच्या विचारांचा ते एक जिवंत प्रवाह आहे. १२ जानेवारी हा दिवस स्वामी विवेकानंद यांची जयंती म्हणून साजरी केली जातो, परंतु खऱ्या अर्थाने हा दिवस युवकांच्या आत्मपरीक्षणाचा, आत्मजागृतीचा आणि नव्या संकल्पांचा दिवस ठरावा अशीच त्यांची अपेक्षा होती.

स्वामी विवेकानंदांचा जन्म १८६३ साली कोलकात्यात झाला. नरेंद्रनाथ दत्त या तरुणाने पुढे संन्यास स्वीकारून 'विवेकानंद' हे नाव धारण केले. बालपणापासूनच त्यांच्या मनात प्रश्नांची गर्दी होती.ईश्वर कोण? जीवनाचा अर्थ काय? माणसाचे कर्तव्य काय? या प्रश्नांची उत्तरे शोधताना त्यांना श्रीरामकृष्ण परमहंस ' गुरू' म्हणून लाभले . गुरू-शिष्याच्या या नात्यातूनच विवेकानंदांचा तेजस्वी विचारविश्वाचा जन्म झाला.

स्वामी विवेकानंदांचे कार्य बहुआयामी होते. त्यांनी हिंदू धर्माला केवळ कर्मकांडात अडकलेला, मागास धर्म म्हणून नव्हे तर विश्वकल्याणाचा संदेश देणारा, वैज्ञानिक आणि मानवतावादी धर्म म्हणून जगासमोर मांडले. “प्रत्येक जीवात शिव आहे” ही अद्वैताची संकल्पना त्यांनी सामान्य माणसापर्यंत पोहोचवली. सेवा म्हणजेच साधना आणि दरिद्र नारायणाची सेवा म्हणजेच ईश्वराची पूजा,हा विचार त्यांनी कृतीतून जगाला दाखवून दिला.

१८९३ साली शिकागो येथे भरलेल्या जागतिक धर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी केलेले भाषण हे भारतीय संस्कृतीच्या इतिहासातील सुवर्णपान आहे. "माय ब्रदर अँड सिस्टरस ऑफ अमेरिका" या शब्दांनी त्यांनी आपले भाषण सुरू केले आणि संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या गजराने दुमदुमून गेले. त्या एका क्षणात भारताचा आत्मा जागतिक व्यासपीठावर उभा राहिला. सहिष्णुता, सर्वधर्मसमभाव आणि मानवता या हिंदू धर्माच्या मूलतत्त्वांची त्यांनी जगाला ओळख करून दिली. धर्म म्हणजे द्वेष नव्हे, तर समन्वय. धर्म म्हणजे संघर्ष नव्हे, तर संवाद हा संदेश त्यांनी ठामपणे मांडला.



स्वामी विवेकानंदांनी हिंदू धर्मासाठी जे कार्य केले, ते केवळ प्रचारापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना करून शिक्षण, आरोग्य, सेवा आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडवून आणला. आजही रामकृष्ण मिशन समाजसेवेचे एक आदर्श केंद्र म्हणून कार्यरत आहे. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे खरे साधन आहे, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणूनच त्यांनी मनुष्यनिर्मितीचे शिक्षण, चारित्र्य घडवणारे शिक्षण यावर भर दिला. “उठा, जागे व्हा आणि ध्येय गाठेपर्यंत थांबू नका” हा त्यांचा सिंहगर्जना करणारा संदेश आजच्या युवकांसाठी अधिकच अर्थपूर्ण आहे. आधुनिक युगातील युवक अनेक आव्हानांनी वेढलेला आहे. व्यसनांचे आकर्षण, दिशाहीनता, स्पर्धेचा ताण, नैराश्य. अशा वेळी विवेकानंदांचे विचार दीपस्तंभासारखे मार्ग दाखवतात. त्यांनी युवकांना शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक दृष्ट्या सक्षम होण्याचा संदेश दिला. दुर्बलता हे पाप आहे असे त्यांनी निर्भीडपणे सांगितले.

आजचा युवक जर खऱ्या अर्थाने स्वामी विवेकानंदांना अभिवादन करू इच्छित असेल, तर केवळ जयंती साजरी करून थांबणे पुरेसे नाही. व्यसनांपासून दूर राहणे, शरीरसंपन्न व सुदृढ जीवन जगणे आणि मनाला विचारांनी समृद्ध करणे हीच खरी आदरांजली ठरेल.

“पुस्तकांची मैत्री” हा विवेकानंदांचा अत्यंत महत्त्वाचा संदेश आहे. वाचनातून विचारांची प्रगल्भता येते, दृष्टिकोन व्यापक होतो आणि आत्मविश्वास बळकट होतो. युवकांनी मोबाईलच्या स्क्रीनऐवजी पुस्तकांच्या पानांत हरवायला शिकले तर त्यांचे जीवन नक्कीच उजळून निघेल.

स्वामी विवेकानंद हे केवळ संन्यासी नव्हते तर ते कृतीशील विचारवंत होते. त्यांनी तरुणांना संन्यास नव्हे तर कर्तव्य शिकवले. देशासाठी काहीतरी करणे, समाजातील दुर्बल घटकांसाठी उभे राहणे आणि स्वतःच्या जीवनात सतत नवीन प्रयत्न करणे,हीच विवेकानंदांची खरी शिकवण आहे. अपयशाने खचून न जाता, त्यातून शिकत पुढे जाण्याची प्रेरणा त्यांनी दिली.

आजच्या आधुनिक युगात विज्ञान, तंत्रज्ञान आणि भौतिक सुखांची रेलचेल आहे.पण तरीही माणूस अस्वस्थ आहे. अशा वेळी विवेकानंदांचे अध्यात्म हे पलायनवादी नसून जीवनाला दिशा देणारे आहे. आत्मविश्वास, स्वाभिमान आणि मानवतेची जाणीव या मूल्यांची आज नितांत गरज आहे. युवकांनी विवेकानंदांचे विचार केवळ भाषणांत न ठेवता, प्रत्यक्ष जीवनात उतरवले तरच खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मिती घडू शकेल.

स्वामी विवेकानंद हे काळाच्या पुढे पाहणारे द्रष्टे होते. त्यांनी युवकांवर अपार विश्वास ठेवला. “मला शंभर तरुण द्या, मी भारताचे भविष्य घडवीन” असे ते ठामपणे म्हणत. आज त्या विश्वासाला उत्तर देण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर आहे. विवेक, विचार आणि मूल्यांच्या आधारे जीवन जगण्याचा संकल्प युवकांनी केला तर स्वामी विवेकानंदांची जयंती खऱ्या अर्थाने साजरी झालेली असेल.

स्वामी विवेकानंदांचा तेजस्वी विचारदीप आजही मार्गदर्शन करत आहे. तो दीप हातात घेऊन, नव्या आत्मविश्वासाने, नव्या संकल्पांनी आणि नव्या प्रयत्नांनी युवकांनी पुढे जायला हवे. कारण विवेकानंदांचे विचार कालबाह्य झालेले नाहीत.उलट, ते आजच्या काळात अधिकच सुसंगत आणि आवश्यक आहेत.

**डॉ. राजेंद्र विमल रामहरी टेकाडे**
काटोल जि. नागपूर
संपर्क - ९१४५७७९०५०

# नायलॉन मांजा आणि त्यातून होणारी निष्पाप मनुष्यहानी

मित्रांनो,
खूप दिवसांपासून तुमच्याशी मनमोकळं हितगुज करण्याची इच्छा होती. मात्र हे हितगुज केवळ संवादापुरतं मर्यादित न राहता समाजासाठी काहीतरी उपयुक्त ठरावं, तरुणांना योग्य दिशा मिळावी आणि भावी पिढीचं नायलॉन मांजामुळे होणारं अपरिमित नुकसान टळावं, या उद्देशाने हा पत्रप्रपंच करत आहे. मित्रांनो, दरवर्षी तिळसंक्रांत येते आणि जाते. आपण सर्वजण गुण्यागोविंदाने एकमेकांना तिळगूळ देतो, मनातील किंतु-परंतु विसरून “गोड बोला”चा संदेश देतो. पुढचं आयुष्य अधिक सुसंवादी, आनंदी व्हावं यासाठी शुभेच्छांची देवाणघेवाण करतो. मात्र याच तिळसंक्रांतीसोबत आपण पतंगांचा सणही मोठ्या हर्षोल्हासात साजरा करतो. “ओ काट... ओ काट...” असे आवाज आसमंतात घुमू लागतात. लहानपणी तिळसंक्रांतीच्या चार-पाच दिवस आधीपासून पतंग उडवण्याची आणि मांजा घोटण्याची मजा काही औरच होती. तो काळ निरागसतेचा होता, आनंदाचा होता. परंतु काळानुरूप या आनंदाच्या सणात नायलॉन मांजाने प्रवेश केला आणि तेव्हापासून या मांजाने अनेक निष्पाप जीव घेतले आहेत. नायलॉन म्हणजे दुसरं काहीही नसून हवेत घुमणारी एक धारदार तलवार आहे. जी नकळत तुमच्या गळ्याशी, चेहऱ्यासमोर येते आणि क्षणात एखाद्या धारदार सुरीप्रमाणे गळा चिरून मृत्यू ओढवते. नायलॉन म्हणजे आनंदाच्या नावाखाली मृत्यूचं आमंत्रण आहे.



मित्रांनो, सण-उत्सव हे माणसाच्या जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. पतंग उडवणं हा आपल्या संस्कृतीतील एक निरागस आणि आनंददायी खेळ आहे. मात्र या आनंदाला काळिमा फासणारा, समाजासाठी घातक ठरणारा प्रकार म्हणजे नायलॉन मांजा. शुल्लक वाटणारी ही गोष्ट आज गंभीर सामाजिक संकट बनली आहे. नायलॉन मांजा दिसायला बारीक, हलका आणि अतिशय मजबूत असतो. हा मांजा इतका धारदार असतो की तुम्ही दोन्ही हातांनी तो तोडण्याचा प्रयत्न केला, तर मांजा तुटत नाही; उलट तुमचे हात सहज कापले जातात. हवेत लोंबकळणारा हा मांजा मानवी शरीरासाठी, पक्ष्यांसाठी आणि पर्यावरणासाठी अत्यंत घातक आहे. या मांज्यामुळे अनेक निष्पाप लोकांचे, विशेषतः दुचाकीस्वारांचे, पादचाऱ्यांचे आणि लहान मुलांचे प्राण गेले आहेत. त्यांच्या कुटुंबियांना आयुष्यभर न भरून निघणारा दुःखाचा डोंगर मिळाला आहे. नायलॉन मांजाने पतंग उडवणं म्हणजे क्षणभराच्या निष्काळजीपणातून आयुष्यभराची हानी ओढवून घेणं होय. हा मांजा म्हणजे पक्ष्यांसाठी तर अक्षरशः कर्दनकाळ आहे. आकाशात मुक्तपणे विहरणारे असंख्य पक्षी या अदृश्य घातक शस्त्रामुळे मृत्युमुखी पडले आहेत. अनेक दुचाकीस्वारांनी या मांज्यामुळे आपले प्राण गमावले आहेत. हा प्रकार म्हणजे आपल्या समाजावर होणारा एक क्रूर हल्लाच आहे. यासाठी जनतेने अधिक जागरूक राहण्याची गरज आहे. जे लोक नायलॉन मांजाने पतंग उडवतात आणि जे लोक केवळ पैशाच्या हव्यासापोटी नायलॉन मांजाचा व्यवसाय करतात, अशा लोकांवर शासनाने कठोर कारवाई केली पाहिजे. समाजानेही अशा गुन्हेगारी प्रवृत्तीविरुद्ध ठाम भूमिका घेतली पाहिजे. नायलॉन मांजा बंद करा — निरागस आनंदाला रक्ताचे डाग लागू देऊ नका.

**विजय मारोडकर**
संस्थापक अध्यक्ष – राष्ट्र निर्माण संघटन
नागपूर
मो. ९७६५९८९६०४

# ललित आणि वैचारिक साहित्याचे स्वरूप

साहित्य हे शब्दरूप असते. साहित्यातून जो सौंदर्यानुभव व्यक्त होतो, त्यालाच आपण कलानुभव असेही म्हणू शकतो. शब्दांच्याद्वारे साहित्याचा, लेखकाला जे सांगायचे आहे त्याचा आविष्कार होतो. नृत्य, नाट्य, चित्र, शिल्प, संगीत, गायन, वादन इत्यादी सादरीकरणात्मक कलांप्रमाणेच साहित्य ही सुद्धा एक महत्त्वाची कला असल्यामुळे तिला ‘शब्दकला’ असेही म्हणता येईल. सौंदर्याचा अनुभव हा कलेचा विषय असतो. इतर कलांप्रमाणेच साहित्यामधूनही सौंदर्याची प्रतीती घडत असते. साहित्याचे स्वरूप उलगडून दाखविताना नेहमी लिखित किंवा मुद्रित साहित्याचे संदर्भ मोठ्या प्रमाणात दिले जातात. पण साहित्य केवळ लिखित किंवा मुद्रित नसते तर ते मौखिकही असते. साधारणपणे मुद्रित साहित्यासाठी ‘साहित्य’ आणि मौखिक साहित्यासाठी ‘वाङ्मय’ हे दोन शब्दप्रयोग आपण समान अर्थाने उपयोगात आणतो. वाक्मय म्हणजे वाणीमय ते वाङ्मय आणि जे केवळ उच्चारले जात नाही, तर ते लिपिबद्धही केले जाते त्याला आपण साहित्य ही संज्ञा बहाल करतो.

साहित्याचे आशय- विषयाच्या दृष्टीने दोन वर्ग किंवा गट करता येतात. कविता, कथा, कांदबरी, नाटक, चरित्र, आत्मकथन, ललितगद्य या प्रकारातील पुस्तकांना आपण ललित साहित्य असे म्हणतो. आशय आणि अभिव्यक्तीतील वेगळेपणाच्या जाणिवेनेच साहित्याचे दोन वर्ग केले जातात. सारांश, आपण साहित्याचे ललित साहित्य आणि ललितेतर साहित्य असे दोन वर्ग करतो. ललितेतर साहित्यालाच शास्त्रीय साहित्य किंवा वैचारिक साहित्य असेही म्हणतो.

ललित साहित्य हे वाचकांच्या भावनांना आवाहन करते, तर वैचारिक साहित्य हे वाचकांच्या विचारांना आवाहन करते. ललित साहित्यात भावनांचे आरोह-अवरोह टिपले जातात; तर वैचारिक साहित्याचा भर विचारांच्या सुसंगत व सुस्पष्ट मांडणीवर असतो. ललित साहित्यात कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललितगद्य असे लेखनप्रकार असतात. ललितेतर किंवा वैचारिक साहित्यात असे अनेक लेखनप्रकार नसतात. त्यात स्फुट निबंधपर आणि दीर्घ ग्रंथात्मक असे दोनच प्रकारचे लेखन संभवू शकते. ललित साहित्यात अनेक उपप्रकार संभवतात; त्यामुळे त्यात वैचित्र्य, नाविन्य आणि विविधता आढळून येते. याउलट वैचारिक साहित्य विशिष्ट नियमांनी बांधलेले असते. वैचारिक किंवा शास्त्रीय साहित्यात प्रतिपाद्य विषयाला प्राधान्य असते. त्यामुळे अशा लेखनात वाच्यार्थाला किंवा निश्चितार्थालाच महत्त्व असते.

ललित साहित्यामध्ये साहित्यिक आपल्या अनुभवांचा आविष्कार करतो. त्याला जीवनाचे जे बरेवाईट अनुभव येत असतात, त्यांच्या आधारे त्याची साहित्यकृती साकार होत असते. त्याला आलेल्या वास्तव जीवनातील अनुभवांचा आधार घेऊन तो जीवनाचा शोध घेत असतो. पण तो आपल्या साहित्यकृतीतून त्याला आलेल्या अनुभवांची कल्पनाशक्तीच्या साहाय्याने पुनर्मांडणी करीत असतो. अनुभव हा ललित साहित्याचा गाभा असतो, त्या अनुभवांचे रंगरूप व्यक्तिपरत्वे भिन्न भिन्न असतात. त्यामुळे या साहित्याला व्यक्तिपरत्वे वेगळेपण प्राप्त होते. यादृष्टीने ललित साहित्य हे व्यक्तिनिष्ठ असते. शास्त्रीय साहित्य हे व्यक्तिनिष्ठ नसते; ते पूर्णपणे वस्तुनिष्ठ असते. शास्त्रीय साहित्य हे ज्ञानाच्या शोधात निघालेले साहित्य असल्याने ते प्रकृतीनेच, स्वाभाविकपणे वस्तुनिष्ठ असते. वस्तुनिष्ठता हा शास्त्रीय साहित्याचा महत्त्वाचा निकष आहे. कारण शास्त्रीय साहित्यात ज्ञान हे महत्त्वाचे असते. ते कोणी सांगितले, कशा तऱ्हेने सांगितले याला फारसे महत्त्व नसते. उलट हे ज्ञान वस्तुनिष्ठपणे, तर्कसंगत रीतीने, सुबोध पद्धतीने सांगणे आवश्यक असते. म्हणून शास्त्रीय साहित्यात वस्तुनिष्ठता, तर्कशुद्धता, क्रमबद्धता ह्या गोष्टी महत्त्वाच्या असतात. ललित साहित्यामध्ये तर्काधिष्ठितता फारसी महत्त्वाची नसते. कारण ललित साहित्य ही एक कला आहे. सौंदर्यात्मक आविष्कार करणे हा कोणत्याही कलेचा प्रमुख हेतू असतो. ललित साहित्याचाही तोच हेतू आहे. याचा अर्थ सौंदर्य हे ललित साहित्याचे आत्मतत्त्व आहे. कारण ललित साहित्य जीवनानुभवातील सौंदर्याचा मागोवा घेत असते. लेखकाला जाणवलेले जीवनसत्य साहित्यात सौंदर्यरूप घेऊन प्रकट होत असते. म्हणूनच साहित्यातील सत्य हे केवळ वस्तुनिष्ठ आणि बुद्धिगम्य न राहता, ते 'अनुभवण्या'चा विषय बनलेले असते. कारण प्रत्यक्ष जीवन कसे आहे, यापेक्षा जीवनाचे रूप त्या लेखकाला कसे जाणवते, याला ललित साहित्यामध्ये महत्त्व असते. कारण ललित साहित्य हे व्यक्तिमनाचा आविष्कार ठरते. अशाप्रकारे ललित साहित्याचे विश्व हे लेखकनिर्मित असते. शास्त्रीय लेखन करणाऱ्या लेखकाची प्रतिभा ज्ञानाचा शोध घेण्यात रंगलेली असते. हा ज्ञानाचा शोध लेखक भाषेच्या द्वारे घेत असतो. म्हणून भाषा येथे केवळ साधन म्हणून आलेली असते. ललित साहित्यामध्ये लेखकाच्या अनुभवाइतकेच तो अनुभव ज्या भाषेतून मांडला जातो; त्या भाषेलाही महत्त्वाचे स्थान असते. कारण ललित साहित्यात शब्दांतून, वाक्यबंधातून अनुभवाचे प्रसरण होत असते. म्हणून ललित साहित्यामध्ये 'काय सांगितले आहे' 'हे 'कसे सांगितले आहे' यापेक्षा वेगळे करता येत नाही. शास्त्रीय साहित्यात मात्र 'काय सांगितले आहे' यालाच महत्त्व असते. ते कोणी, केव्हा, कुठे, कसे सांगितले आहे; याला महत्त्व नसते. कारण त्यातील विचार सार्वत्रिक असतो. वाचकांच्या मनावर जिथे विचार हाच घटक प्रामुख्याने ठसविला जातो, ते ललितेतर शास्त्रीय साहित्य असते. जिथे भावना, सौंदर्य, लालित्य हे घटक प्रामुख्याने जाणवतात ते ललित साहित्य असते. ललित साहित्य हे मूलतः व्यक्तिनिष्ठ, भावप्रेरित, कल्पनानिर्मित असते. त्यात अनुभवांचे वैशिष्ट्यपूर्ण सुसंघटन असते. ललितेतर साहित्य हे मूलतः वस्तुनिष्ठ, बुद्धिप्रेरित असते. ते तर्क आणि अनुमान यावर भर देणारे असते. त्यामुळे त्यातील संघटना ही तर्काधिष्ठित असते. वैचारिक साहित्यातील आशयाच्या आविष्काराचा एक ठराविक साचा असतो. ललित साहित्यात होत असलेला लेखकाचा आविष्कार व्यक्तिसापेक्ष, अनुभवजन्य असतो. तो विषयसापेक्ष नसतो. शास्त्रीय साहित्यातील आविष्कार विषयसापेक्ष असतो, तो लेखक लेखकसापेक्ष नसतो. तो एकाच विषयाचा ज्ञानात्मक संस्कार असल्यामुळे त्यात लेखकनिरपेक्षता असते. वैचारिक साहित्यात आशय आणि अभिव्यक्ती यांच्यात द्वैत असते; त्यामुळे अभिव्यक्ती वेगळ्या तऱ्हेने झाली तरी आशयाचे स्वरूप बदलत नाही. याउलट ललित साहित्यात आशय आणि अभिव्यक्ती यांच्यात अद्वैत असते. त्यामुळे अभिव्यक्ती बदलली की आशय बदलतो. वैचारिक साहित्याचे लेखन यांत्रिक, एकसुरी, साचेबंद असते. याउलट ललित साहित्यातील आविष्कार लवचिक, संमिश्र, व्यक्तिनिष्ठ असतो. तो अनुभवाला साजेसा, योग्य, सोयीस्कर असे रूप धारण करतो. ललित साहित्यातून प्रकटलेले सत्य कलात्मक, स्थलकालातीत असते. कारण साहित्यिक नुसती निर्जीव प्रतिकृती निर्माण करीत नसून तो 'सर्जनशील अनुकृती' निर्माण करीत असतो. शास्त्रीय सत्य हे स्थलकालबद्ध, परिवर्तनीय असते. ललित साहित्यात सत्यावर कविप्रतिभेचे संस्कार होतात. त्यामुळे ललित साहित्यात सूचकता, अनेकार्थता असते आणि वैचारिक साहित्याला ह्या गोष्टी वर्ज्य असतात. अशाप्रकारे ललित आणि वैचारिक साहित्य परस्परांहून भिन्न, वेगळे असते. त्यामुळेच ते स्वतंत्र, वैशिष्ट्यपूर्ण असते, असे म्हणता येईल.

डॉ.एस.एम.कानडजे
बुलढाणा-443001

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

१ २ ३ ४ ५ ६

**महत्त्वाचे...**



### ओवैसी म्हणाले- आसामच्या मुख्यमंत्र्यांच्या डोक्यात ट्यूबलाइट

ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (AIMIM) चे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी रविवारी सांगितले की, आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्या डोक्यात ट्यूबलाइट आहे. ते म्हणाले की, सरमा यांना संविधानाची समज नाही. ओवैसी यांनी शनिवारी म्हटले होते की, या देशाची पंतप्रधान हिजाब परिधान केलेली मुलगी देखील होऊ शकते. याला उत्तर देताना हिमंत म्हणाले होते की, घटनात्मकदृष्ट्या याला कोणतीही अडचण नाही. कोणीही पंतप्रधान होऊ शकते. परंतु भारत एक हिंदू राष्ट्र आहे आणि पंतप्रधान नेहमीच एक हिंदू व्यक्ती असेल.AIMIM प्रमुखांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, हिमंता यांनी संविधानाची शपथ घेतली आहे. हे संविधानात कुठे लिहिले आहे? पाकिस्तानच्या संविधानात लिहिले आहे की, फक्त एका समुदायाची व्यक्तीच त्या देशाचा पंतप्रधान आणि राष्ट्रपती होऊ शकते. आपल्या देशात बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान दिले. ते हिमंत बिस्वा सरमा यांच्यापेक्षा जास्त बुद्धिमान आणि सुशिक्षित होते.

### पतीनं शिकवलं, SI होताच पत्नीने मागितला घटस्फोट




भोपाळच्या कुटुंब न्यायालयात एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. पतीने पौरोहित्य करून पैसे जमा केले आणि पत्नीला शिकवले, जेणेकरून ती पोलिस अधिकारी बनू शकेल. सब-इन्स्पेक्टर होताच पत्नीने न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केला. पत्नीचे म्हणणे आहे की, पतीच्या पेहरावामुळे आणि त्याच्या व्यवसायामुळे तिला लाज वाटू लागली आहे. त्याचा 'लूक' चांगला वाटत नाही. तर, पतीचे म्हणणे आहे की पत्नी त्याची शेंडी कापण्यासाठी दबाव आणते.

लग्नाच्या वेळी महिलेचे स्वप्न पोलिस दलात भरती होण्याचे होते. पतीने तिच्या या इच्छेचा आदर केला. पती व्यवसायाने पंडित आहे आणि पूजा-पाठ करून घर चालवतो. त्याने आपल्या कमाईचा मोठा भाग पत्नीच्या शिक्षणासाठी आणि तयारीसाठी खर्च केला. पतीसमोर बदलण्याची अट ठेवली. पत्नीची मेहनत फळाला आली आणि ती सब-इन्स्पेक्टर बनली. यश मिळताच पत्नीचे पतीप्रतीचे वर्तन बदलू लागले. तिच्या पेहरावामुळे आणि 'लुक्स'मुळे पत्नीला चिडचिड होऊ लागली आणि तिने यात बदल करण्याची अट ठेवली. पतीने जेव्हा पत्नीचे म्हणणे ऐकण्यास नकार दिला, तेव्हा महिलेने न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केला. नोकरी लागल्यानंतर काही काळानंतर पत्नीला पतीचे 'धोतर-कुर्ता' घालणे आणि डोक्यावर 'शिखा' (शेंडी) ठेवणे खटकू लागले. पत्नीचे म्हणणे आहे की, तिला पतीच्या या लुकमुळे आणि पौरोहित्य करण्याच्या कामामुळे समाजात लाज वाटते.

# ट्रम्प यांना इराणवर हल्ल्याचा प्लॅन सांगण्यात आला

## अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा निर्णय घेणे बाकी; सरकारविरोधी हिंसाचारात २१७ लोकांच्या मृत्यूचा दावा

दिव्य वतन /वृत्तसेवा

इराणमध्ये गेल्या दोन आठवड्यांपासून सरकारविरोधी निदर्शने सुरू आहेत. यादरम्यान, अमेरिकन अधिकाऱ्यांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना इराणवरील संभाव्य लष्करी हल्ल्यांच्या पर्यायांबद्दल माहिती दिली आहे.

न्यूयॉर्क टाइम्सच्या वृत्तानुसार, जर इराण सरकारने निदर्शकांवर कारवाई केली, तर ट्रम्प लष्करी पाऊल उचलण्यावर गांभीर्याने विचार करत आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले की, राष्ट्राध्यक्षांनी अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नाही.

ट्रम्प यांनी शनिवारी सोशल मीडियावर लिहिले, "इराण स्वातंत्र्याकडे पाहत आहे, जे यापूर्वी कधीही घडले नाही. अमेरिका मदतीसाठी तयार आहे." तर, इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर कालिबाफ यांनी रविवारी इशारा दिला की, जर अमेरिका किंवा इस्रायलने इराणवर हल्ला केला, तर दोघांनाही कठोर प्रत्युत्तर दिले जाईल.

दुसरीकडे, टाइम मॅगझिनने तेहरानमधील एका डॉक्टरांच्या हवाल्याने सांगितले की, किमान २१७ निदर्शकांचा मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. न्यूज एजन्सी AP नुसार, आतापर्यंत २६०० हून अधिक लोकांना अटक करण्यात आली आहे.

इराणवर अमेरिकेच्या हल्ल्याच्या शक्यतेमुळे इस्रायल हाय अलर्टवर आहे. रॉयटर्सने इस्रायली सूत्रांच्या हवाल्याने सांगितले आहे की, परिस्थिती पाहता इस्रायली सुरक्षा यंत्रणांनी सतर्कता वाढवली आहे.

इस्रायल आणि इराण जूनमध्ये 12 दिवसांचे युद्ध लढले आहेत, ज्यात अमेरिकेने इस्रायलसोबत मिळून हवाई हल्ले केले होते. शनिवारी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू आणि अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्यात फोनवर चर्चा झाली.

अहवालानुसार, या चर्चेत इराणमध्ये अमेरिकेच्या हस्तक्षेकाच्या शक्यतेवर चर्चा झाली. अमेरिकन अधिकाऱ्याने कॉलची पुष्टी केली, परंतु चर्चेच्या मुद्द्यांचा खुलासा केला नाही.

इराणची अमेरिका आणि इस्रायलला धमकी

इराणने अमेरिकेच्या संभाव्य लष्करी कारवाईवर तीव्र इशारा दिला आहे. इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर कलिबाफ यांनी म्हटले आहे की, जर आंदोलकांवरून अमेरिकेने इराणवर हल्ला केला, तर अमेरिकन सैन्य आणि इस्रायल दोन्ही इराणच्या निशाण्यावर असतील.

इराणच्या नेतृत्वाने संभाव्य प्रत्युत्तरादाखल कारवाईत इस्रायललाही थेट लक्ष्य केले जाईल असे म्हटले जाण्याची ही पहिलीच वेळ आहे.




# अहवाल- ग्रीनलँडवर हल्ल्यासाठी योजना बनवताहेत ट्रम्प: विशेष कमांडोना जबाबदारी

दिव्य वतन /वृत्तसेवा

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ग्रीनलँडवर ताबा मिळवण्यासाठी योजना तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. डेली मेलनुसार, ट्रम्प यांनी जॉइंट स्पेशल ऑपरेशन्स कमांड (JSOC) ला ही जबाबदारी सोपवली आहे. मात्र, लष्करी अधिकारी या विचाराशी सहमत दिसत नाहीत. ते याला कायदेशीरदृष्ट्या चुकीचे मानतात.

अहवालात म्हटले आहे की, ट्रम्प यांची ही आवड देशांतर्गत राजकारणाशी देखील संबंधित असू शकते. या वर्षाच्या शेवटी मध्यावधी निवडणुका होणार आहेत आणि रिपब्लिकन पक्षाला संसदेवरील नियंत्रण गमावण्याची भीती वाटत आहे. त्यामुळे ट्रम्प कोणतेतरी मोठे पाऊल उचलून लोकांचे लक्ष अर्थव्यवस्थेच्या समस्यांवरून हटवू इच्छितात.

डेली मेलला एका राजनैतिक सूत्राने सांगितले की, 'जनरल्सना वाटते की



ट्रम्प यांची ग्रीनलँड योजना मूर्खपणाची आणि बेकायदेशीर आहे. त्यांचे म्हणणे आहे की, राष्ट्राध्यक्षांचा हट्ट पाच वर्षांच्या मुलाशी व्यवहार करण्यासारखा आहे.'अहवाल- युरोपीय देशांना NATO सोडण्यासाठी भाग पाडत आहेत ट्रम्प

अमेरिकेने ग्रीनलँडवर हल्ला केल्यास यामुळे NATO साठी गंभीर संकट निर्माण होऊ शकते. तसेच युरोपीय नेत्यांशी थेट संघर्ष होऊ शकतो, ज्यामुळे NATO युती तुटण्याच्या मार्गावर येऊ शकते.

काही युरोपीय अधिकाऱ्यांचे मत आहे की ट्रम्पच्या आसपासच्या कट्टरपंथी MAGA गटाचा खरा उद्देश NATO ला आतून संपवणे हा आहे, कारण संसद त्यांना NATO मधून बाहेर पडण्याची परवानगी देणार नाही.

त्यामुळे ग्रीनलँडवर कब्जा करून युरोपीय देशांना NATO सोडण्यास भाग पाडले जाऊ शकते. अहवालात म्हटले आहे की जर ट्रम्पना NATO संपवायचे असेल, तर हा कदाचित सर्वात सोपा मार्ग असू शकतो.'

ट्रम्प NATO ला का कमकुवत करू इच्छितात किंवा तोडू इच्छितात?

मीडिया रिपोर्टनुसार, ट्रम्प दीर्घकाळापासून NATO ला अनुचित मानतात. त्यांचे मत आहे की अमेरिका यात सर्वाधिक पैसा आणि संसाधने खर्च करतो, तर युरोपीय देश त्यांच्या जीडीपीच्या 2% संरक्षणावर खर्च करण्याच्या उद्दिष्टाची पूर्तता करत नाहीत.

पहिल्या कार्यकाळात, त्यांनी NATO सहयोगींकडून देयके वाढवण्याची मागणी केली आणि सांगितले की जर त्यांनी ऐकले नाही तर अमेरिका त्यांचे संरक्षण करणार नाही. 2024 च्या निवड[illegible]रात, ट्रम्प म्हणाले की [illegible]ाला त्या NATO सदस्यांवर हवे ते करण्याची परवानगी देतील जे पुरेसा खर्च करत नाहीत.

ट्रम्प यांचा उद्देश "अमेरिका फर्स्ट" धोरणाला प्रोत्साहन देणे आहे. ज्यात ते अमेरिकन करदात्यांचा पैसा परदेशी सुरक्षेवर कमी खर्च करू इच्छितात. त्याचबरोबर युरोपला स्वतःचे संरक्षण स्वतःच करण्यास भाग पाडू इच्छितात.

काही विश्लेषकांचे मत आहे की ट्रम्प NATO ला कमकुवत करून रशियासोबत चांगले संबंध प्रस्थापित करू इच्छितात. ट्रम्पचे माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॉन बोल्टन यांनी म्हटले होते की ते NATO मधून अमेरिकेला बाहेर काढण्याचा प्रयत्न करतील. ते याला जुने आणि अमेरिकेसाठी ओझे मानतात.

तथापि, अनेक तज्ञ चेतावणी देतात की यामुळे अमेरिका एकटे पडू शकते.

# 99व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात 'चौथा मजला' कादंबरीचे दिमाखदार प्रकाशन

दिव्य वतन /वृत्तसेवा

सातारा :येथील ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात लेखिका कस्तुरी देवरूखकर (मुंबई) यांच्या 'चौथा मजला' या कादंबरीचे दिमाखदार प्रकाशन उत्साहात पार पडले. कादंबरीचे प्रकाशन श्री. राजा दीक्षित (प्रमुख, विश्वकोश मंडळ) आणि श्री. प्रमोदजी शिंदे (प्रमुख, मनशक्ती केंद्र) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी ज्येष्ठ विचारवंत श्री. विश्वास वसेकर, पुणे विद्यापीठाचे श्री. संदीप सांगळे, प्रकाशन समितीचे प्रमुख समन्वयक व 'साहित्य चपराक'चे प्रकाशक श्री. घनश्याम पाटील सर तसेच समिती सदस्य श्री. केशव मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी कादंबरीच्या विषयाची आणि लेखिकेच्या लेखनशैलीची प्रशंसा केली. 'चौथा मजला' ही केवळ एका इमारतीभोवती फिरणारी कथा नसून, मानवी मनातील दडलेले कप्पे, दाबून ठेवलेल्या भावना, अबोल नाती आणि अचानक




उलगडणाऱ्या सत्याचा शोध घेणारी कादंबरी आहे. कथेमध्ये वाचकांना आपल्यासारखीच सामान्य माणसे भेटतात; मात्र त्यांच्या आयुष्यात सुरू असलेल्या अंतर्गत संघर्षांचे, गुपितांचे आणि वेदनांचे प्रभावी चित्रण लेखिकेने केले आहे. 'चौथा मजला' हा केवळ वास्तू नसून तो मानवी मनातील एक बंद दरवाजा आहे, जो उघडला की आयुष्याला नवे वळण मिळते, असा आशय कादंबरीतून मांडण्यात आला आहे. ही कादंबरी वाचकांना 'आपण पाहतो तेच खरे असते का?' आणि 'सत्य स्वीकारण्याची आपली तयारी आहे का?' असे प्रश्न विचारण्यास प्रवृत्त करते. रोमांचक आणि विचारप्रवर्तक अशी ही कादंबरी वाचकांना वेगळा साहित्यिक अनुभव देणारी ठरत आहे. 'चौथा मजला' ही कादंबरी चपराक प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केली असून कादंबरीला १२० पाने आहेत. कादंबरीची किंमत २०० रुपये आहे. वाचक ही कादंबरी shop.chaprak.com या संकेतस्थळावरून ऑनलाइन मागवू शकतात. तसेच घरपोच मागणीसाठी ७०५७२९२०९२ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

# अखिलेश म्हणाले- भाजप तुमच्या संपर्कात आहे की नाही?:केशव मौर्य यांच्यावर पलटवार

दिव्य वतन /वृत्तसेवा

सपाचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांनी उपमुख्यमंत्री केशव मौर्य यांच्यावर पलटवार केला. ते म्हणाले की, भाजप त्यांच्या संपर्कात आहे की नाही? केशव मौर्य यांच्या टीकेनंतर अखिलेश यादव यांनी हे विधान केले आहे. केशव यांनी दावा केला होता की, सपाचे आमदार त्यांच्या संपर्कात आहेत.

अखिलेश यादव यांनी रविवारी सोशल मीडिया X वर पोस्ट केले. लिहिले - आधी हे सांगा की भाजप तुमच्या संपर्कात आहे की नाही. तुम्ही मेन लाईनमध्ये आहात की साईड लाईनमध्ये आहात की



आऊट ऑफ लाईन आहात?

अखिलेश यादव आणि केशव यादव यांच्यातील वक्तव्यांची ही फेरी नवीन नाही. यापूर्वीही दोन्ही नेत्यांनी अनेकदा एकमेकांवर टीका केली आहे. नुकत्याच झालेल्या बिहार निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पाटणा विमानतळावर दोन्ही नेत्यांची भेट झाली होती. त्यावेळी अखिलेश यादव म्हणाले होते की, केशव यांनी मिठाई खाऊ घालण्याचं वचन दिलं आहे. निकाल लागल्यानंतर केशव मौर्य म्हणाले की, आम्ही मिठाई घेऊन अखिलेश यादव यांची वाट पाहत आहोत. ते मिठाई खाण्यासाठी येतच नाहीत.

याव्यतिरिक्त, अखिलेश यादव आणि केशव मौर्य यांच्यात सोशल मीडिया साइट एक्सवर वेळोवेळी आरोप-प्रत्यारोप आणि एकमेकांवर टीका सुरू असते. जसे की, अयोध्येच्या पोस्टरमधून केशव यांचा फोटो गायब झाल्याबद्दल अखिलेश यादव यांनी टीका केली होती.

त्याचप्रमाणे, केशव यांनीही वेळोवेळी अखिलेश यादव यांना निराश आणि समाजवादी पक्षाला 'समाप्तवादी पक्ष' असे म्हटले आहे.

# भागवत म्हणाले- आरएसएस बदलत नाहीये वेळेनुसार आपले स्वरूप समोर आणत आहे

दिव्य वतन /वृत्तसेवा


राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (RSS) सरसंघचालक मोहन भागवत यांनी रविवारी सांगितले की, संघ बदललेला नाही, तर तो हळूहळू विकसित होत आहे आणि वेळेनुसार त्याचे स्वरूप समोर आले आहे. ते म्हणाले की लोक याला बदल म्हणून पाहत आहेत, तर मूळ विचार आणि चारित्र्य तेच आहे.

भागवत नवी दिल्लीत RSS च्या १०० वर्षांच्या प्रवासावर आधारित 'शतक' या चित्रपटाच्या गीतांच्या अल्बम प्रकाशन सोहळ्यात बोलत होते. या प्रसंगी गायक सुखविंदर सिंग, चित्रपट दिग्दर्शक आशिष मल्ल, सह-निर्माता आशिष तिवारी आणि RSS चे वरिष्ठ पदाधिकारी भय्याजी जोशी देखील उपस्थित होते.

संघप्रमुखांनी सांगितले, 'RSS आपली शंभरावी जयंती साजरी करत आहे. जसा जसा संघटनेचा विस्तार झाला आणि तिने नवनवीन रूपे घेतली, लोकांना हा बदल झाल्यासारखे वाटू लागले. पण प्रत्यक्षात तो बदलत नाहीये, तर तो हळूहळू समोर येत आहे.'

भागवत म्हणाले- संघ आणि डॉ. हेडगेवार समानार्थी

आरएसएसचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचा उल्लेख करताना भागवत म्हणाले की, ते जन्मजात देशभक्त होते आणि त्यांनी लहानपणीच देशसेवा हे आपल्या जीवनाचे ध्येय बनवले होते. ते म्हणाले, 'संघ आणि



डॉक्टरसाहेब एकाच तत्त्वाची दोन नावे आहेत.'

भागवत यांनी सांगितले की, डॉ. हेडगेवार केवळ 11 वर्षांचे होते, जेव्हा प्लेगमुळे त्यांच्या आई-वडिलांचे निधन झाले. यामुळेही त्यांचे व्यक्तिमत्त्व कमकुवत झाले नाही. ते म्हणाले की, इतक्या कमी वयात मोठ्या आघातानंतरही डॉ. हेडगेवार यांचा स्वभाव आणि विचार दृढ राहिले, जे त्यांची मानसिक दृढता आणि संतुलित विचारसरणी दर्शवते.

डॉ. हेडगेवार यांच्या व्यक्तिमत्त्वावर आणि मानसिक संरचनेवर अभ्यास आणि संशोधन केले जाऊ शकते, असेही ते म्हणाले.28 डिसेंबर- हिंदू समाजाला एकत्र आणणे हे संघाचे उद्दिष्ट, सनातन धर्माला पुन्हा जिवंत करण्याची वेळ आली आहे.मोहन भागवत यांनी हैदराबादमध्ये सांगितले होते की, आता सनातन धर्माला पुन्हा जिवंत करण्याची वेळ आली आहे. त्यांनी सांगितले की, सुमारे 100 वर्षांपूर्वी योगी अरविंद यांनी म्हटले होते की, सनातन धर्माला पुन्हा जिवंत करणे ही देवाची इच्छा आहे आणि हिंदू राष्ट्राचा उदय सनातन धर्माला पुन्हा जिवंत करण्यासाठीच आहे.

# इंस्टाग्रामच्या १.७५ कोटी वापरकर्त्यांचा डेटा लीक:फोन नंबर-ईमेल डार्क वेबवर विकले जाताहेत; सर्वाधिक वापरकर्ते भारतातील

दिव्य वतन /वृत्तसेवा

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामच्या 1.75 कोटींहून अधिक वापरकर्त्यांचा वैयक्तिक डेटा लीक झाला आहे. ही माहिती सायबर गुन्हेगारांच्या हाती लागली आहे.

अँटीव्हायरस सॉफ्टवेअर फर्म मालवेअरबाईट्सच्या अहवालानुसार, लीक झालेल्या डेटामध्ये युझरनेम, घराचा पत्ता, फोन नंबर, ईमेल अ‍ॅड्रेस यांसारख्या गोष्टींचा समावेश आहे.

कंपनीने सांगितले की, हा डेटा डार्क वेबवर विकला जात आहे आणि यामुळे फिशिंग किंवा अकाउंट हॅकिंगसारखे धोके वाढू शकतात.

2024 मध्ये झालेल्या सुरक्षा उल्लंघनामुळे डेटा लीक

मालवेअरबाईट्सने आपल्या ग्राहकांना ईमेलमध्ये सांगितले की, ही गळती त्यांच्या नियमित डार्क वेब स्कॅनमध्ये पकडली गेली. हे 2024 मध्ये इंस्टाग्रामच्या API (ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस, जे ॲप्सना एकमेकांशी जोडते) शी संबंधित आहे. कंपनीने सांगितले की, या डेटामुळे सायबर गुन्हेगार वापरकर्त्यांना नुकसान पोहोचवू शकतात.

भारताला सर्वाधिक फटका बसू शकतो

स्टॅटिस्टाच्या मते, भारतात ऑक्टोबर 2025 पर्यंत इंस्टाग्रामचे सर्वाधिक 48 कोटी वापरकर्ते आहेत. येथे फेसबुक आणि व्हॉट्सॲपचेही 50 कोटींहून अधिक वापरकर्ते आहेत, जी मेटाची सर्वात मोठी बाजारपेठ आहे. लीक झालेल्या डेटामध्ये भारतातील वापरकर्त्यांची माहिती देखील असू शकते, त्यामुळे भारतीय वापरकर्त्यांसाठी धोका वाढू शकतो.

ही लीक फक्त इंस्टाग्रामपुरती मर्यादित राहणार नाही. तज्ञांनी चेतावणी दिली आहे की लीक झालेल्या क्रेडेंशियल्स (लॉगिन तपशील) वापरून हॅकर्स:

फिशिंग: तुम्हाला बनावट ईमेल किंवा मेसेज पाठवून फसवू शकतात.

अकाउंट टेकओवर: तुमचे अकाउंट हायजॅक करू शकतात.

क्रेडेंशियल स्टफिंग: जर तुम्ही इतर ठिकाणी (उदा. फेसबुक, नेटफ्लिक्स किंवा बँक) देखील तोच पासवर्ड वापरत असाल, तर हॅकर्स तिथेही घुसखोरी करू शकतात.

तुमचे इंस्टाग्राम अकाउंट सुरक्षित कसे ठेवाल?

सेटिंग्ज उघडून Where you're logged in मध्ये





जा. जर कोणतेही अनोळखी डिव्हाइस दिसले, तर ते त्वरित काढून टाका.टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन (2FA) नक्की चालू ठेवा.वेळोवेळी तुमचा पासवर्ड बदला.

मेटाने डेटा ब्रीचचे आरोप फेटाळलेमेटाच्या प्रवक्त्याने डेटा ब्रीचची गोष्ट नाकारली आहे. त्यांनी सांगितले की, आम्ही एक समस्या दुरुस्त केली आहे ज्यामुळे कोणतीही बाहेरील व्यक्ती काही इंस्टाग्राम वापरकर्त्यांसाठी पासवर्ड रीसेट ईमेल पाठवण्याची विनंती करू शकत होती.

## आरोग्य...

### कधीच होणार नाही डायबिटीज, ७ दिवसांत झपाट्याने कमी करतात रक्तातील साखर, वयाच्या ७० नंतरही रहा फिट





जागतिक स्तरावर मधुमेह ही एक गंभीर आरोग्य समस्या बनली असून भारताला 'मधुमेहाची राजधानी' म्हटले जाते. रक्तातील साखर अनियंत्रितपणे वाढणे हे शरीराच्या विविध अवयवांसाठी घातक ठरू शकते. हल्ली तर विशीतल्या तरूणांनाही डायबिटीज होऊ लागला आहे. औषधांशिवाय रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी आहार हा सर्वात प्रभावी मार्ग आहे.

प्रसिद्ध आहारतज्ज्ञ डायना लिकाल्जी यांच्या मते, काही विशिष्ट पदार्थांचा समावेश केल्यास केवळ ७ दिवसांत रक्तातील साखरेवर सकारात्मक परिणाम दिसून येतो. मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठी आहारतज्ज्ञांनी सुचवलेले ७ 'सुपरफूड्स' खालीलप्रमाणे आहेत

भेंडी ही भाजी मधुमेहाच्या रुग्णांसाठी अत्यंत गुणकारी मानली जाते. यामध्ये विरघळणारे फायबर भरपूर प्रमाणात असते, जे रक्तातील साखरेचे शोषण धीमे करते. यामुळे जेवणानंतर रक्तातील साखर एकदम वाढत नाही. भेंडीचे सेवन केल्यामुळे शरीराची इन्सुलिन संवेदनशीलता वाढते, ज्यामुळे शरीर साखरेचा वापर अधिक प्रभावीपणे करू शकते. रोजच्या आहारात भेंडीचा समावेश केल्यास रक्तातील साखरेची पातळी स्थिर राहण्यास मदत होते.

एवोकाडो : निरोगी चरबी आणि फायबरचा संगम

एवोकाडोमध्ये 'हेल्दी फॅट्स' आणि फायबरचा एक दुर्मिळ मिलाफ असतो. हे फळ पचन संस्था मंदावण्यास मदत करते, ज्यामुळे कार्बोहायड्रेट्सचे रूपांतर साखरेत होण्यासाठी जास्त वेळ लागतो. परिणामी, रक्तातील ग्लुकोजची पातळी स्थिर राहते. जरी हे फळ थोडे महाग असले, तरी त्यातील पोषक घटक इन्सुलिन रेसिस्टन्स कमी करण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरतात. मधुमेहाच्या रुग्णांसाठी हे एक उत्कृष्ट 'लो-कार्ब' फळ आहे.

मशरूम : सूज कमी करणारे सुपरफूड

मशरूममध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर असतात, पण कर्बोदके अत्यंत कमी असतात. मधुमेहामध्ये शरीरात अनेकदा अंतर्गत सूज असते, जी इन्सुलिनला काम करण्यापासून रोखते. मशरूमचे सेवन ही सूज कमी करण्यास मदत करते. त्यामुळे शरीर इन्सुलिनला चांगला प्रतिसाद देऊ लागते. मशरूम हे केवळ पौष्टिकच नाही, तर रक्तातील ग्लुकोज मॅनेज करण्यासाठी देखील उत्तम मानले जाते.

टोफू : स्नायूंच्या मजबुतीसाठी प्रथिने

शाकाहारी लोकांसाठी टोफू हा प्रथिनांचा एक उत्तम पर्याय आहे. टोफूमधील प्लांट प्रोटीन शरीरातील 'लीन मसल्स' तयार करण्यास आणि टिकवून ठेवण्यास मदत करतात. शरीरात स्नायूंचे प्रमाण जितके चांगले असेल, तितके शरीर ग्लुकोजचा वापर उर्जेसाठी चांगल्या प्रकारे करू शकते. यामुळे रक्तातील अतिरिक्त साखर कमी होण्यास मदत होते. टोफूचा आहारात समावेश केल्याने दीर्घकाळ पोट भरलेले राहते आणि साखरेची पातळी नियंत्रणात राहते.

ग्रीन टी : चयापचय क्रिया सुधारण्यासाठी

ग्रीन टी मध्ये 'कॅटेचिन्स' नावाचे शक्तिशाली अँटीऑक्सिडंट्स असतात. हे घटक शरीरातील ग्लुकोज मेटाबॉलिज्म (चयापचय क्रिया) वाढवतात आणि चरबी जाळण्यास मदत करतात. जेव्हा शरीरातील चरबीचे प्रमाण कमी होते, तेव्हा रक्तातील साखर व्यवस्थापित करणे सोपे जाते. दिवसातून एक ते दोन कप ग्रीन टी प्यायल्याने इन्सुलिनची कार्यक्षमता वाढते आणि रक्तातील साखरेचे चढ-उतार कमी होण्यास मदत मिळते.

फ्लॉवर : इन्सुलिनच्या कार्यास समर्थन

फ्लॉवरमध्ये 'सल्फोराफेन' नावाचे महत्त्वाचे संयुग आढळते. हे संयुग शरीरातील सूज कमी करते आणि इन्सुलिनच्या कार्याला सक्रिय पाठिंबा देते. फ्लॉवरमध्ये फायबर जास्त आणि कॅलरीज कमी असल्याने ते वजन कमी करण्यासाठी आणि साखर नियंत्रित करण्यासाठी एक आदर्श भाजी आहे. रोजच्या जेवणात फ्लॉवरचा समावेश केल्यास रक्तातील ग्लुकोजच्या व्यवस्थापनात सातत्य राहते आणि शरीराला आवश्यक पोषक तत्वे मिळतात.

जवस (जौ) : आंतड्याच्या आरोग्यासाठी फायदेशीर

जवस हे फायबरयुक्त संपूर्ण धान्य असून ते रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी अत्यंत प्रभावी आहे. त्यातील 'बीटा-ग्लुकन' हे फायबर रक्तातील साखर वेगाने वाढू देत नाही. जवसाचे सेवन केल्याने आंतड्यांमधील चांगल्या बॅक्टेरियांची वाढ होते, जे ग्लुकोज लेव्हल स्थिर राखण्यास मदत करतात. पांढऱ्या तांदळाऐवजी जवसाचा समावेश केल्यास रक्तातील साखरेचे प्रमाण संतुलित राहण्यास मोठी मदत होते.

### १०० वर्ष जगणारे जपानी लोक अन्न तेच खातात जे आपण खातो तरीही लठ्ठ का होत नाही?

जपानी लोकांचे दीर्घायुष्य आणि सडपातळ शरीरयष्टी हे केवळ नशिबावर अवलंबून नसून ती त्यांच्या संस्कृतीचा एक भाग आहे. जिथे पाश्चात्य देशांत फास्ट फूड आणि बैठी जीवनशैली वाढली आहे, तिथे जपानमध्ये आजही ताजे अन्न आणि शारीरिक कष्ट यांना प्राधान्य दिले जाते. त्यांच्या आहारात केवळ पोट भरण्यापेक्षा शरीराला आवश्यक पोषण देण्यावर भर असतो. 'ओमेगा-३' युक्त मासे आणि पचन सुधारणारे आंबवलेले पदार्थ त्यांच्या आतड्यांचे आरोग्य उत्तम राखतात. तसेच, चालणे ही त्यांच्यासाठी व्यायामाची गोष्ट नसून ती एक दैनंदिन गरज आहे. जमिनीवर बसण्याच्या त्यांच्या पारंपारिक पद्धतीमुळे त्यांचे स्नायू आणि पाठीचा कणा दीर्घकाळ लवचिक राहतो. या सर्व सवयींचे शिक्षण त्यांना लहानपणापासूनच दिले जाते, ज्यामुळे निरोगी राहणे ही त्यांची एक नैसर्गिक जीवनपद्धती बनली आहे. जपानच्या या आरोग्य रहस्यांचा अवलंब केल्यास आपणही लठ्ठपणा आणि अनेक आजारांपासून दूर राहू शकतो. जपानी लोकांच्या आहारात प्रामुख्याने ताजे मासे, समुद्रप्रदत्त भाज्या, तांदूळ आणि हिरव्या भाज्यांचा समावेश असतो. ते प्रक्रिया केलेले अन्न टाळतात. त्यांच्या आहारात कोबी, फ्लॉवर आणि ब्रोकोली यांसारख्या भाज्यांचे प्रमाण जास्त असते, ज्या कर्करोगाचा धोका कमी करण्यास मदत करतात. ओमेगा-३ फॅटी ॲसिड्समुळे त्यांचे हृदय आरोग्य आणि मेंदूची कार्यक्षमता उत्कृष्ट राहते.

# ब्रेकअपच्या दाव्यांदरम्यान तारा सुतारियाची पहिली पोस्ट:सोशल मीडियावर आपल्या आगामी चित्रपट टॉक्सिकचे पोस्टर शेअर केले

वीर पहाडियासोबत ब्रेकअपच्या चर्चांदरम्यान, तारा सुतारियाने शनिवारी सोशल मीडियावर तिची पहिली पोस्ट शेअर केली आहे. ताराने अभिनेता यशसोबत त्याच्या आगामी 'टॉक्सिक' चित्रपटाशी संबंधित एक पोस्ट शेअर केली.

तिने चित्रपटाचे पोस्टर शेअर केले आणि सांगितले की, त्याच्या टीझरला 24 तासांत सर्व प्लॅटफॉर्मवर एकूण 20 कोटींहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. पोस्टरमध्ये लाल रंगाची पार्श्वभूमी आहे. यात यश हातात रायफल घेऊन उभा असलेला दिसत आहे.


दुसरीकडे, शनिवारी वीरला मुंबईतील कलिना विमानतळावर पाहिले गेले. तो त्याचा भाऊ शिखर पहाडिया आणि अभिनेत्री जान्हवी कपूरसोबत दिसला होता.

खरं तर, अलीकडेच फिल्मफेअर वेबसाइटने आपल्या अहवालात दावा केला होता की दोघांचे नाते संपले आहे. सूत्रांच्या हवाल्याने दावा करण्यात आला की दोघांनी परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, ब्रेकअपचे कारण काय आहे, हे स्पष्ट झालेले नाही. तारा आणि वीर, दोघांनीही अद्याप यावर कोणतेही अधिकृत विधान केलेले नाही.

तारा आणि वीर यांच्या डेटिंगची सुरुवात 2025 च्या सुरुवातीला झाली होती. दोघांना अनेकदा खाजगी ठिकाणी एकत्र पाहिले गेले होते. यानंतर त्यांच्या नात्याबद्दल चर्चा तीव्र झाली होती. मार्च 2025 मध्ये दोघांनी एका फॅशन इव्हेंटमध्ये एकत्र हजेरी लावली होती. याशिवाय गणेश चतुर्थीच्या निमित्तानेही दोघे एकत्र दिसले होते.

तारा आणि वीर दोघेही चर्चेत होते

अलीकडेच तारा आणि वीर दोघेही चर्चेत होते. खरं तर, डिसेंबर 2025 च्या शेवटी मुंबईत झालेल्या एपी ढिल्लोंच्या एका कॉन्सर्टचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. या व्हिडिओमध्ये तारा स्टेजवर गायकासोबत दिसली होती. तारा आणि एपीने कॉन्सर्टमध्ये एकत्र परफॉर्म केले. परफॉर्मन्सदरम्यान एपीने ताराला मिठी मारली आणि गालावर चुंबन घेतले होते.



याच कॉन्सर्टमध्ये प्रेक्षकांमध्ये उपस्थित असलेल्या वीरच्या प्रतिक्रियेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता, ज्यात त्याला कथितरित्या अस्वस्थ दाखवण्यात आले होते.

तरीही, या व्हिडिओबद्दल ताराने इंस्टाग्रामवर पोस्ट करून म्हटले होते की खोट्या गोष्टी आणि पेड पीआरमुळे सत्य बदलत नाही.

वर्क फ्रंटबद्दल बोलायचं झाल्यास, तारा लवकरच 'टॉक्सिक' चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात यश, कियारा अडवाणी आणि हुमा कुरेशी देखील आहेत. हा चित्रपट 19 मार्च रोजी प्रदर्शित होईल.

वीरबद्दल बोलायचं झालं तर, त्याने गेल्या वर्षी अक्षय कुमारसोबत 'स्काय फोर्स' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं होतं. या चित्रपटात त्याने स्क्वाड्रन लीडर अजमादा बोप्पैया देवैयाची भूमिका साकारली होती. हा चित्रपट 24 जानेवारी 2025 रोजी प्रदर्शित झाला होता.

## 'लक्ष्मी निवास' मालिकेला केला रामराम, लोकप्रिय अभिनेत्रीची 'बिग बॉस मराठी ६' मध्ये एन्ट्री; ओळखलं का?

मुंबई - 'बिग बॉस मराठी ६ 'चं पर्व आज ११ जानेवारी पासून सुरू झालं असून, या कार्यक्रमाचा ग्रँड प्रीमिअर सोहळा पार पडतो आहे. बिग बॉस मराठीचं पाचवं पर्व झाल्यानंतर आता यंदाच्या पर्वात कल्ला करायला कोणते स्पर्धक सहभागी होणार याकडे प्रेक्षकांचं लक्ष वेधलं आहे. सोशल मीडियावर काही कलाकारांच्या चर्चा रंगल्या होत्या. काही प्रोमोसुद्धा कलर्स मराठीने सोशल मीडियावर शेअर केले होते. त्यावरून दीपाली सय्यद, आयुष साळुंके, सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर करण सोनावणे 'बिग बॉस मराठी ६'मध्ये सहभागी होणार असल्याचा अंदाज प्रेक्षकांनी वर्तवला. अशातच आता 'लक्ष्मी निवास' फेम अभिनेत्रीची बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वात एन्ट्री झाली आहे.

'बिग बॉस मराठी' मध्ये कोणते स्पर्धक सहभागी होणार याची उत्सुकता प्रेक्षकांना होती. बिग बॉसच्या घरात दीपाली सय्यद, सागर कारंडे, खान्देशी गायक सचिन कुमावत, सोनाली राऊतची एन्ट्री झाली. सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर करण सोनावणेनं 'बिग बॉस मराठी ६'च्या घरात एन्ट्री घेतली आहे. त्याचबरोबर आता '३६ गुणी जोडी' फेम अभिनेता आयुष संजीवची एन्ट्री झाली आहे. पण, त्याच्यासोबत आणखी एका अभिनेत्रीनं एन्ट्री घेतली आहे. 'लक्ष्मी निवास' फेम तन्वी कोलतेची बिग बॉसमध्ये एन्ट्री झाली आहे.




सध्या अभिनेत्री झी मराठी वाहिनीवरील 'लक्ष्मी निवास' या मालिकेमध्ये 'सिंचना संपत गाडेपाटील' ची भूमिका साकारत होती. मात्र, आता अभिनेत्रीनं ही मालिका सोडली असून बिग बॉसमध्ये सहभागी झाली आहे. तन्वीला पाहून चाहते आश्चर्यचकित झाले आहेत. आता 'लक्ष्मी निवास' या मालिकेत सिंचनाची भूमिका कोण साकारणार हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे.

दरम्यान, 'बिग बॉस मराठी ६' मध्ये सहभागी झालेल्या कलाकारांचं नशीब कसं पालटणार, त्याचबरोबर बिग बॉसच्या घरात हे कलाकार काय गोंधळ घालतायत. हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. 'बिग बॉस मराठी ६' दररोज

## सचिन पिळगावकरांसोबत अफेअरची झालेली चर्चा, सुप्रसिद्ध अभिनेत्रीनं सोडलं मौन

मुंबई - सुप्रसिद्ध मराठी अभिनेते सचिन पिळगावकर यांनी आजवर अनेक गाजलेल्या सिनेमांमध्ये काम केलं आहे. सचिन यांनी हिंदी सिनेमांमध्येही भूमिका साकारल्या आहेत. १९८२ मध्ये प्रदर्शित झालेला 'नादियों के पार' हा सिनेमा प्रचंड गाजला. या सिनेमामध्ये सचिन पिळगावकर आणि साधना सिंग मुख्य भूमिकेत होते. साधना सिंग यांनी या सिनेमात 'गुंजा'ची भूमिका साकारलेली. 'नादियों के पार' या सिनेमातील 'गुंजा-चंदन'ची जोडी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली. या सिनेमादरम्यान सचिन आणि साधना यांच्या अफेअरच्या चर्चा रंगलेल्या. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये साधना यांनी सचिन यांच्यासोबतच्या अफेअरच्या चर्चांवर मौन सोडलं आहे.




'न्यूज १८'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये साधना सिंग म्हणाल्या की, 'मी जेव्हा मुंबई फिरायला आलेले तेव्हा आमची भेट झालेली. मैफिल रंगलेली, आम्ही गाणं गात होतो. त्यानंतर जेव्हा मी 'नदियां के पार' सिनेमासाठी आले मुंबईत तेव्हा त्यांना माहित नव्हतं. सचिन यांनी ऑफिसमध्ये विचारलं, सिनेमाची हिरोईन कोण आहे. तेव्हा त्यांना माझा फोटो दाखवण्यात आला. त्यांनी मला ओळखलं आणि म्हणाले, 'ही तर साधना, मी ओळखतो हिला.' जेव्हा आम्ही शूटिंगसाठी गेलो तेव्हा मी सचिनसोबत खूप कम्पफर्टेबल होते.'

'आम्ही एकमेकांची मस्करी करायचो. हळू-हळू आम्ही एकमेकांचे चांगले मित्र बनलो. आमचं अफेअर आहे, असं लोक म्हणायचे. पण तसं काहीच नव्हतं. आमच्यात फक्त चांगली मैत्री होती. माझ्या लग्नानंतरही आमच्यात चांगली मैत्री होती. पण, एक व्यक्ती आमच्यामध्ये आली आणि सगळं बिघडलं. त्यामुळे आम्ही एकमेकांपासून दूर झालो. मात्र, आता जर आम्ही कुठेही भेटलो तर नक्की बोलतो.' असं साधना यांनी पुढे सांगितलं.

## मुंबई विमानतळावर पापाराझींशी भिडला रणवीर:दीपिकाचा हात धरून बाहेर पडला, फोटो काढण्यापासून रोखले; दावा- मुलगी दुआ सोबत होती



धुरंधरच्या यशाच्या दरम्यान रणवीर सिंग आणि दीपिका पदुकोण नवीन वर्षाचा आनंद साजरा करत होते. रविवारी हे जोडपे लाँग वेकेशनवरून मुंबईला परतले आहे. या जोडप्याला एकमेकांचा हात धरून मुंबई विमानतळावर पाहिले गेले.

एअरपोर्टमधून बाहेर पडताना दीपिका पादुकोण आणि रणवीर सिंहने पापाराझींना पोज दिल्या. दीपिका कारजवळ पोहोचताच, पापाराझी तिच्या मागे जात कारजवळ आले. हे पाहून रणवीर सिंहने पापाराझींना हात दाखवून थांबवले आणि सतत फोटो क्लिक न करण्याची विनंती करत राहिला.यावेळी रणवीर-दीपिकाची सुरक्षा टीमही पापाराझींना मागे हटवताना दिसली. पापाराझी विरल भयानीच्या पेजवर रणवीरच्या व्हिडिओसोबत दावा केला जात आहे की तो दीपिकाला नाही तर मुलगी दुआला कॅमेऱ्यांच्या नजरेपासून वाचवत होता. मात्र, समोर आलेल्या कोणत्याही व्हिडिओमध्ये त्यांची मुलगी दुआची झलक दिसली नाही.

चित्रपट धुरंधर बॉक्स ऑफिसवर सातत्याने मोठे विक्रम प्रस्थापित करत आहे. हा चित्रपट 5 डिसेंबर 2025 रोजी प्रदर्शित झाला होता. वर्षाच्या शेवटच्या महिन्यात प्रदर्शित होऊनही, हा 2025 वर्षातील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला. यासोबतच, चित्रपटाने बॉक्स ऑफिसवरील स्पर्धेत अनेक चित्रपटांना मागे टाकले आहे. खरं तर, धुरंधर प्रदर्शित झाल्यानंतर 20 दिवसांनी कार्तिक आर्यन आणि अनन्या पांडे यांचा 'तू मेरी मैं तेरा, मैं तेरा तू मेरी' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. दीर्घकाळ प्रदर्शित होऊनही धुरंधर चित्रपटाने कार्तिकच्या चित्रपटापेक्षा जास्त कमाई केली. त्यानंतर धुरंधरची टक्कर धर्मेंद्र आणि अगस्त्या नंदा यांच्या इक्कीस चित्रपटाशी झाली आणि इक्कीस चित्रपटही धुरंधरसमोर टिकू शकला नाही. आता चित्रपटगृहांमध्ये धुरंधरची स्पर्धा प्रभासच्या राजा साब चित्रपटाशी होत आहे.

## इंडियन आयडल ३ चा विजेता प्रशांत तमांगचे निधन

### ४३ वर्षांच्या वयात हृदयविकाराचा झटका आला, पाताल लोक २ मध्ये दिसला होता

गायक आणि अभिनेता प्रशांत तमांग याचे रविवारी वयाच्या 43 व्या वर्षी निधन झाले. एनडीटीव्हीच्या वृत्तानुसार, त्याला स्ट्रोक आला होता आणि त्याचे निधन नवी दिल्ली येथील त्यांच्या निवासस्थानी झाले. प्रशांतने टीव्ही शो इंडियन आयडल सीझन 3 जिंकून देशभरात प्रसिद्धी मिळवली होती. याशिवाय, तो वेब सिरीज पाताल लोकच्या दुसऱ्या भागात डॅनियलच्या भूमिकेतही दिसला होता.

प्रशांतच्या अचानक निधनाच्या बातमीवर प्रतिक्रिया देताना, दार्जिलिंगचे भाजप खासदार आणि पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते राजू बिष्टा म्हणाले की, तमांग यांच्या जाण्याने गोरखा समुदाय आणि कला व संगीत जगाला मोठा धक्का बसला आहे. ते म्हणाले की, 2007 मध्ये इंडियन आयडल जिंकणे हा गोरखा समाजासाठी अभिमानाचा क्षण होता. या विजयाने नेपाळी संगीताला राष्ट्रीय ओळख मिळवून दिली.

राजू बिष्टा यांनी असेही म्हटले की, रिॲलिटी शोमध्ये तमांगचा प्रवास दार्जिलिंगच्या टेकड्या, तराई, डुआर्स, सिक्कीम आणि ईशान्येकडील लोकांना एकत्र जोडणारा होता. त्यांनी सांगितले की, इंडियन आयडॉलमध्ये भाग घेताना तमांग वेस्ट बंगाल पोलीस ऑर्केस्ट्रात सेवा देत होते.

माहितीनुसार, इंडियन आयडॉल जिंकल्यानंतर प्रशांत तमांगने आपला पहिला अल्बम 'धन्यवाद' रिलीज केला होता. त्याने परदेशातही अनेक लाइव्ह शो केले. नंतर त्याने चित्रपटांकडे मोर्चा वळवला आणि २०१० साली नेपाळी चित्रपट 'गोरखा पलटण' मधून अभिनयाची सुरुवात केली.



## अर्थविश्व...

### अमेरिकेचं टॅरिफ कार्ड, पण 4 देश ठरतायत भारताचे Export Hub, एका देशात तर 56 टक्क्यांची निर्यात वाढ



अमेरिकेने भारतावर लादलेल्या 50 टक्के आयात शुल्कामुळे भारतीय निर्यात दारांनी नवीन बाजारपेठा शोधण्यास सुरुवात केली आहे. अनेक नवे पर्याय भारतीय निर्यातदाऱ्यांना या दरम्यान उपलब्ध झाले आहे. युरोपिय देशातील भारताच्या निर्यातीत मोठी वाढ झाली आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, युरोपियन युनियनमधील 27 देशांमध्ये स्पेन, जर्मनी, बेल्जियम आणि पोलंड हे भारतीय वस्तूंसाठी प्रमुख निर्यात हब म्हणून उदयास येत आहेत.

56 टक्क्यांचीन निर्यात वाढ

स्पेन हे भारतीय निर्यातीसाठी सर्वात वेगाने वाढणारी युरोपीय बाजारपेठ म्हणून समोर आले आहे. चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते नोव्हेंबर या काळात स्पेनला होणारी भारतीय निर्यात 56 टक्क्यांहून अधिक वाढली आहे. या काळात स्पेनला झालेली निर्यात मागील आर्थिक वर्षातील याच कालावधीतील 3 अब्ज डॉलर्सवरून वाढून 4.7 अब्ज डॉलर्स झाली आहे. भारताच्या एकूण निर्यातीत स्पेनचा वाटा 2.4 टक्क्यांपर्यंत वाढला आहे, ज्यात 0.5 टक्के अंकांची वाढ झाली आहे.

त्याचप्रमाणे, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या आठ महिन्यांत जर्मनीला होणारी भारताची निर्यात 9.3 टक्क्यांनी वाढून 6.8 अब्ज डॉलर्सवरून 7.5 अब्ज डॉलर्स झाली आहे. भारताच्या एकूण निर्यातीत 2.6 टक्के वाटा आणि 0.2 टक्क्यांच्या हिस्सेदारी वाढीसह, जर्मनी भारतीय उत्पादनांसाठी स्थिर मागणी प्रदान करत आहे," असे एका अधिकाऱ्याने सांगितले. एप्रिल-नोव्हेंबर 2025-26 या काळात बेल्जियमला होणारी देशाची निर्यात 4.2 अब्ज डॉलर्सवरून वाढून 4.4 अब्ज डॉलर्स झाली आहे. याच कालावधीत पोलंडला भारताची निर्यात 7.6 टक्क्यांनी वाढून 1.82 अब्ज डॉलर्स झाली आहे, तर एप्रिल-नोव्हेंबर 2024 मध्ये ती 1.69 अब्ज डॉलर्स होती. एकूण, हे कल युरोपसाठी भारताच्या निर्यात धोरणाचे प्रतिबिंब आहेत," असे अधिकाऱ्याने नमूद केले. स्पेनमध्ये वेगाने वाढणारी मागणी, जर्मनीमध्ये स्थिर वाढ आणि बेल्जियममधील स्थिरता हे दर्शवते की भारताची निर्यात संतुलित आहे, ज्यामध्ये जुन्या बाजारपेठांमध्ये मजबुती आणि नवीन बाजारपेठांमध्ये निर्यात वाढ दोन्ही घटक समाविष्ट आहेत.

### येत्या आठवड्यात शेअर बाजारात 6 कंपन्यांचे आयपीओ येणार, 5 इश्यू लिस्ट होणार, गुंतवणूकदारांना मोठी संधी




पुढच्या आठवड्यात शेअर बाजारात अनेक आयपीओ येणार आहेत. 12 जानेवारी ते 16 जानेवारी या काळात तब्बल सहा नवीन कंपन्या आपले IPO घेऊन बाजारात येत आहेत. या 6 IPO पैकी सर्वात मोठा IPO `Amagi Media Labs` या कंपनीचा आहे, जो मेनबोर्डवर लिस्ट होणार आहे. उरलेले पाच IPO हे लहान कंपन्यांसाठी आहेत, ज्यांना एसएमई लिस्टिंग म्हणतात. या नवीन IPO व्यतिरिक्त, आणखी 5 कंपन्यांचे इश्यू शेअर बाजारात लिस्ट होणार आहेत, ज्यांच्यावर गुंतवणूकदारांची नजर असेल.

1700 हून अधिक कोटींचा आयपीओ

IPO मंगळवार, 13 जानेवारी रोजी उघडेल आणि शुक्रवार, 16 जानेवारी रोजी बंद होईल. ही कंपनी तब्बल 1,789 कोटी रुपयांचा IPO आणत आहे. `Amagi Media Labs` ही एक क्लाउड-आधारित एड-टेक आणि मीडिया टेक्नॉलॉजी कंपनी आहे. या कंपनीने आपल्या शेअरची किंमत 343 रुपये ते 361 रुपये प्रति शेअर निश्चित केली आहे. ही कंपनी BSE आणि NSE या दोन्ही ठिकाणी लिस्ट होणार आहे.

`Amagi Media Labs` कनेक्टेड टीव्ही आणि FAST (Free Ad-Supported Streaming TV) या सेगमेंटमध्ये काम करते. कनेक्टेड टीव्ही म्हणजे असे टीव्ही जे इंटरनेटशी जोडले जाऊ शकतात आणि FAST म्हणजे असे टीव्ही चॅनेल जे तुम्ही मोफत पाहू शकता, पण त्यावर जाहिराती येतात. `Amagi` च्या सेवा अमेरिका, युरोप आणि आशियामध्ये उपलब्ध आहेत. ही कंपनी 700 हून अधिक कंटेंट ब्रँड्सना आपल्या सेवा देते आणि जगभरात 2,000 हून अधिक चॅनेल चालवण्यासाठी मदत करते. या IPO मधून जमा होणाऱ्या पैशांचा वापर कंपनी प्रामुख्याने टेक्नॉलॉजीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी, क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर सुधारण्यासाठी आणि इतर कंपन्यांना खरेदी करण्यासाठी करणार आहे. एसएमई सेगमेंटमध्ये हे IPO पुढील आठवड्यात एसएमई सेगमेंटमध्ये पाच IPO उघडणार आहेत. `Narmada Brass Industries` आणि `Avana Electrosystems` हे सोमवार, 12 जानेवारी रोजी उघडतील. `Narmada Brass Industries` ने आपल्या BSE SME इश्यूसाठी 515 रुपये प्रति शेअर असा फिक्स प्राइस ठेवला आहे. तर, `Avana Electrosystems` चा प्राइस बँड 56 ते 59 रुपये आहे आणि हा NSE SME वर लिस्ट होईल. मंगळवार, 13 जानेवारी रोजी आणखी दोन एसएमई IPO, `GRE Renew Enertech` आणि `Indo SMC`, बोलीसाठी उघडतील. `GRE Renew Enertech` चा प्राइस बँड 100 ते 105 रुपये आहे, तर `Indo SMC` ने 141 ते 149 रुपये प्रति शेअर अशी प्राइस रेंज निश्चित केली आहे. हे दोन्ही इश्यू आठवड्याच्या शेवटी बंद होतील. पुढील आठवड्यातील शेवटचा एसएमई IPO `Armour Security India` हा बुधवार, 14 जानेवारी रोजी उघडेल. याचा प्राइस बँड 55 ते 57 रुपये आहे आणि हा 19 जानेवारी रोजी बंद होईल.




# सोफी डिव्हाईन ४२ चेंडूत ९५ धावा करून बाद, ८ षटकार मारले; गुजरात- १४०/३

महिला प्रीमियर लीग (WPL) मध्ये आज दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायंट्स यांच्यात सामना होणार आहे. नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियमवर सायंकाळी ७:३० वाजता हा सामना सुरू होईल.

दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दोन्ही संघांनी त्यांच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये कोणताही बदल केला नाही.

डब्ल्यूपीएलच्या चौथ्या हंगामातील दोन्ही संघांचा हा दुसरा सामना आहे. शनिवारी गुजरात जायंट्सने यूपी वॉरियर्सचा १० धावांनी पराभव केला. दरम्यान, दिल्ली कॅपिटल्सचा मुंबई इंडियन्सकडून ५० धावांनी पराभव झाला.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिला एकदिवसीय सामनाही वडोदरा येथे खेळला जात आहे.

दोन्ही संघांचे प्लेइंग-11

दिल्ली कॅपिटल्स: जेमिमाह रॉड्रिग्ज (कर्णधार), शेफाली वर्मा, लॉरा वोल्वार्ड, लिझेल ली, मारिझान कॅप, निकी प्रसाद, शिनेल हेन्री, स्नेह राणा, मिन्नू मणी, एन श्री चरणी, नंदनी शर्मा.


गुजरात जायंट्स: ॲशले गार्डनर (कर्णधार), बेथ मुनी, सोफी डिव्हाईन, जॉर्जिया वेरेहम, अनुष्का शर्मा, भारती फुलमाळी, कनिका आहुजा, काश्वी गौतम, तनुजा कंवर, राजेश्वरी गायकवाड, रेणुका सिंग ठाकूर.

## IND vs NZ: राणा दा जिंकलंस...

### विराट आणि गिलची अर्धशतके, पण हर्षितमुळे भारताची विजयी बोहनी, न्यूझीलंडवर साकारला थरारक विजय

वडोदरा: विराट कोहलीचे शतक काही धावांनी हुकले, तर शुभमन गिलने अर्धशतक झळकावले. पण या दोघांपेक्षाही यावेळी मनं जिंकली ती हर्षित राणाने. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना ३०० धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना विराट आणि गिल यांनी शतकी भागीदारी रचली होती. पण हे दोघे बाद झाले आणि भारताचा डाव अडचणीत आला होता. पण त्यावेळी हर्षित राणाने जलदगतीने २९ धावा करत संघाला विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला. हर्षितने गोलंदाजीतही दोन बळी मिळवले होते. त्यामुळे हर्षित राणाने या विजयात मोला वाटा उचलला. त्यामुळे भारताचा या सामन्यात चार विकेट्स राखत विजय मिळवता आला.

भारताला या सामन्यात रोहित शर्माने दणदणीत सुरुवात करून दिली. रोहित शर्मा चांगल्या फॉर्तामं होता आणि पहिल्या षटकापासून त्याने दमदार फटकेबाजी करायला सुरुवात केली. सहाव्या षटकात त्याने जो षटकार मारला तो नजरेचे पारणे फेडणारा होता. रोहित फक्त तेवढ्यावर थांबला नाही. त्यानंतर पुन्हा एकदा रोहित शर्माने जोरदार फटका मारत लाँग ऑनला षटकार लगावला. रोहित यावेळी मोठी खेळी साकारणार, असे वाटत होते. पण रोहितला यावेळी मोठी खेळी साकारता आली नाही. रोहित शर्माने या सामन्यात ३ चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर २६ धावांची खेळी साकारली. रोहित शर्मा बाद झाला आणि त्यानंतर विराट कोहली फलंदाजीला आला आणि त्याने धडाकेबाज फटकेबाजी करायला सुरुवात केली.विराट कोहलीने यावेळी आक्रमक फटकेबाजी करत शुभमन गिललाही मागे टाकले. विराट कोहली आणि शुभमन गिल यांनी यावेळी दुसऱ्या विकेटसाठी ११८ धावांची भागीदारी रचत भारताला विजयाच्या समीप आणले. विराटने अर्धशतक तर पूर्ण केले आणि तो शतकाच्या दिशेने कूच करायला लागला. विराट कोहली आता शतक झळकावणार, असे वाटत होते. पण शतकाच्या जवळ आल्यावर तो बाद झाला. विराट कोहलीने यावेळी ८ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ९३ धावा केल्या. शुभमन गिलनेही यावेळी अर्धशतक झळकावले खरे, पण त्याने त्यासाठी जास्त चेंडू घेतले. शुभमन यावेळी ७१ चेंडूंत ३ चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ५६ धावा करू शकला. विराट बाद झाल्यावर रवींद्र जडेजा फलंदाजीला आला आणि त्याला फक्त चार धावा करता आल्या. पण त्यानंतर श्रेयस अय्यरने भारताचा डाव सावरला. श्रेयस अर्धशतकाच्या जवळ आला होता, पण एका धावेने त्याचे अर्धशतक हुकले. श्रेयसने यावेळी ४ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ४९ धावा केल्या. श्रेयस बाद झाला आणि भारताचा डाव अडचणीत आला. पण हर्षित राणाने यावेळी दमदार फलंदाजी करत भारताला विजयाची आशा दाखवली.



## तमीम इक्बालला भारतीय एजंट म्हटल्याने वाद

### बांगलादेशी क्रिकेटपटू त्यांच्याच बोर्डावर संतापले; अध्यक्ष म्हणाले- संचालकांचे विधान वैयक्तिक मत




बांगलादेश क्रिकेट बोर्ड (BCB) च्या फायनान्स डायरेक्टरांनी तमीम इक्बालला भारताचा एजंट म्हटल्याने वाद निर्माण झाला आहे. कर्णधार नजमुल हसन शांतो, तस्किन अहमद, माजी कर्णधार मोमिनुल हक आणि फिरकीपटू ताइजुल इस्लाम यांसारख्या अनेक क्रिकेटपटूंनी या विधानावर तीव्र आक्षेप घेतला आहे.

यानंतर BCB चे अध्यक्ष अमीनुल इस्लाम म्हणाले आहेत- 'हे त्या संचालकाचे वैयक्तिक मत होते. मी संबंधित अधिकाऱ्याकडून स्पष्टीकरण मागितले आहे.'

इस्लाम पुढे म्हणाले- 'तमीमने देशासाठी खूप काही मिळवले आहे आणि सार्वजनिक विधान करताना त्यांनी हे लक्षात ठेवायला हवे होते.'

एक दिवसापूर्वी शुक्रवारी BCB च्या फायनान्स कमिटीचे अध्यक्ष नजमुल यांनी एका फेसबुक पोस्टमध्ये तमीम इक्बालला भारतीय एजंट म्हटले होते.

नजमुल यांनी ही पोस्ट तमीमच्या त्या विधानानंतर केली होती, ज्यात माजी बांगलादेशी कर्णधाराने BCB ला टी-20 विश्वचषकाच्या बाबतीत शहाणपणाने निर्णय घेण्याचा सल्ला दिला होता.

BCB अध्यक्ष अमीनुल इस्लाम यांनी हे देखील म्हटले-

आम्हाला अजूनपर्यंत ICC कडून कोणतेही उत्तर मिळालेले नाही. आम्ही आमच्या चिंतांशी संबंधित सर्व कागदपत्रे आणि पुरावे पाठवले आहेत.

भारतातील कोणत्याही शहरात सामने हलवल्याने आमच्या चिंता दूर होणार नाहीत. भारतातील कोणतेही पर्यायी ठिकाण भारतातच राहील.

जर ICC ने आम्हाला श्रीलंकेत सामने खेळण्याची परवानगी दिली नाही, तर आम्ही पुढे काय करू, यावर सध्या काहीही सांगू शकत नाही.

मी हैदराबाद आणि चेन्नईबद्दल ऐकले नाही. सोमवार किंवा मंगळवारपर्यंत आम्हाला काही माहिती मिळण्याची शक्यता आहे.

शांतो म्हणाले- अशा प्रकारचे विधान दुःखद आहे

नजमुलच्या विधानावर बांगलादेशच्या कसोटी संघाचा कर्णधार नजमुल हसन शांतो म्हणाला- 'हे अस्वीकार्य आहे. एक खेळाडू, तो माजी कर्णधार असो वा नसो, सन्मानाचा हक्कदार असतो, शेवटी एक क्रिकेटपटू सन्मानाची अपेक्षा करतो.'

शांतो व्यतिरिक्त, वेगवान गोलंदाज तस्कीन अहमद, माजी कर्णधार मोमिनुल हक आणि फिरकीपटू ताइजुल इस्लाम यांच्यासह अनेक क्रिकेटपटूंनी नाराजी व्यक्त केली.

माजी क्रिकेटपटू म्हणाले- हे विधान मनोधैर्य खच्ची करणारे आहे

या प्रकरणी बांगलादेश क्रिकेटर्स वेल्फेअर असोसिएशन (BCWA) ने म्हटले आहे की, 'BCB संचालक नजमुल यांनी माजी कर्णधार तमीम इक्बालबद्दल केलेले विधान धक्कादायक आहे.

BCWA ने म्हटले- तमीम बांगलादेशचा सर्वात यशस्वी सलामीवीर राहिला आहे. त्याने 16 वर्षे देशाचे प्रतिनिधित्व केले आहे. हे केवळ तमीमसारख्या खेळाडूबद्दल नाही.


देशातील कोणत्याही क्रिकेटपटूविरुद्ध अशा प्रकारच्या टिप्पण्या संपूर्ण क्रिकेट समुदायासाठी अस्वीकार्य आणि अपमानकारक आहेत.

काय आहे संपूर्ण प्रकरण

तमीम इक्बालने बीबीसीला दिलेल्या मुलाखतीत बांगलादेश क्रिकेट संघाबाबत एक सल्ला दिला होता.

ते म्हणाले होते की, भारतात होणाऱ्या टी-20 विश्वचषकात भाग घ्यायचा की नाही, याचा निर्णय भावनांच्या आहारी जाऊन नव्हे, तर भविष्यातील परिणामांचा विचार करून घेतला पाहिजे.

तमीमच्या या वक्तव्यानंतर, बीसीबीचे संचालक आणि वित्त समितीचे अध्यक्ष नजमुल यांनी एका सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले - 'यावेळी बांगलादेशच्या लोकांनी आपल्या डोळ्यांनी एका भारतीय एजंटचा उदय होताना पाहिला आहे.'



## WPL २०२६ मधून यास्तिका भाटिया बाहेर पडली:गुडघ्याच्या शस्त्रक्रियेतून सावरू शकली नाही; गुजरात जायंट्सने ५० लाखांना विकत घेतले होते

विकेटकीपर-फलंदाज यास्तिका भाटिया विमेन्स प्रीमियर लीग (WPL) 2026 मध्ये खेळू शकणार नाही. गुडघ्याच्या लिगामेंट शस्त्रक्रियेनंतर ती पूर्णपणे तंदुरुस्त होऊ शकली नाही. गेल्या वर्षी झालेल्या मिनी लिलावात गुजरात जायंट्सने तिला 50 लाख रुपयांना विकत घेतले होते.

यास्तिकाची या हंगामातील उपलब्धता आधीपासूनच संशयाच्या भोवऱ्यात होती. तिने ऑक्टोबर 2025 मध्ये गुडघ्याची लिगामेंट शस्त्रक्रिया करून घेतली होती. WPL व्यवस्थापनाने लिलावापूर्वी फ्रँचायझींना स्पष्ट केले होते की, जर यास्तिकाला विकत घेतले गेले आणि ती स्पर्धेतून बाहेर पडली, तर संघाला तिच्या जागी दुसऱ्या खेळाडूला घेण्याची परवानगी दिली जाणार नाही.

तरीही गुजरात जायंट्स आणि यूपी वॉरियर्सने तिच्यावर बोली लावली. शेवटी गुजरात जायंट्सने तिला 50 लाख रुपयांना आपल्या संघात समाविष्ट केले.

गुजरात जायंट्सचे प्रशिक्षक मायकल क्लिंगर यांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ पोस्ट करून यास्तिकाच्या रिकव्हरीसाठी शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की, संघ तिला पूर्णपणे तंदुरुस्त होऊन भविष्यात गुजरात जायंट्ससाठी खेळताना पाहण्याची अपेक्षा करत आहे.

संघाने सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले की यास्तिका ऑरेंज जर्सीमध्ये चमकू शकली असती, पण परिस्थिती तिच्या बाजूने नव्हती. फ्रँचायझीने तिच्या लवकर बरे होण्याची कामना केली आहे.

सामन्यादरम्यान यास्तिका संघासोबत होती

WPL 2026 च्या पहिल्या सामन्यात, जो नवी मुंबईत गुजरात जायंट्स आणि यूपी वॉरियर्स यांच्यात खेळला गेला, यास्तिका भाटिया संघासोबत उपस्थित होती. मात्र, ती मैदानात उतरली नाही आणि स्टँडमध्ये टीम ओनर्ससोबत बसून गुजरात जायंट्सला सपोर्ट करताना दिसली.

या हाय-स्कोअरिंग सामन्यात गुजरात जायंट्सने यूपी वॉरियर्सला 10 धावांनी हरवले.







## महत्त्वाचे...

### दगडाने ठेचून मारण्याचा प्रयत्न, मारहाण करणारा अतुल सावेंचा 'खास'



मुंबई-शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवे यांनी त्यांच्या ट्विटरवर एक धक्कादायक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये काही लोक एका व्यक्तीला अमानुष मारहाण करत असल्याचे दिसून येत आहे. तसेच यातील एक व्यक्ती तर थेट दगडाने मारण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे. मारहाण करणारी व्यक्ती ही भाजप नेते व मंत्री अतुल सावे यांच्या जवळची असल्याचा दावा दानवे यांनी केला आहे. अंबादास दानवे यांनी ट्विट करत म्हटले की, क्रूरता समोर आल्यावर कोणी मंत्रिपद गमावले तर कोणी तुरुंगात तुरुंगात सडत आहे. पण मंत्री अतुल सावे यांचा 'खास माणूस' असलेला हा मारकूटा माजी नगरसेवक कायद्याला मात्र भीक घालत नाही, असे दानवे म्हणाले.पुढे अंबादास दानवे म्हणाले, 'पार्टी विथ डिफरन्स'च्या छत्राखाली या असल्या धिंगाण्याला किती काळ संरक्षण देणार मेवाभाऊ? दगडाखाली दबलेला तो लाचार माणूस आज कुठे आहे? सत्तेच्या माजात त्याचा आवाजच कायमचा दबून गेला? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. ज्यांच्या हातात कायदा आहे, त्यांनी गुन्हेगाराची 'भक्ती' करण्यापेक्षा पीडिताला न्याय देण्याची हिंमत दाखवावी. सत्तेची ऊब असली की गुन्हेगारांचे हात कुणीही बांधू शकत नाही, हेच आजच्या सत्ताधारी मंडळींचे वास्तव आहे! बरोबर न देवभाऊ? असा सवाल अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून केला आहे.

### नगरपालिकेत लैंगिक अत्याचाराच्या आरोपीला सदस्यत्व



अंबरनाथमध्ये भाजपकडून लैंगिक अत्याचार प्रकरणातील संशयित आरोपीला नगरपालिकेचे सदस्यत्व दिले असून यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर टीका केली आहे. त्याला तुम्ही स्वीकृत सदस्य करतात, तुम्हाला काही लाजा वाटत नाही? असा संतप्त सवाल राऊत यांनी उपस्थित केला आहे. तसेच देवेंद्र फडणवीस यांनी एक निवडणूक दाखवावी ज्यात त्यांनी हिंदू-मुस्लिम वाद लावलेला नाही, माझ्याकडून मी 11 लाख इनाम देईल, असे थेट आव्हान राऊतांनी केले आहे. संजय राऊत म्हणाले, भाजपला असे वाटते की जनता मूर्ख आहे. त्यांनी केलेल्या सर्व पापकर्मांना जनता मान्यता देईल, असे त्यांना वाटते. माघार घेण्याची ही त्यांची तिसरी वेळ आहे. एमआयएमसोबत जेव्हा युती केली आणि गोंधळ झाला तेव्हा मुख्यमंत्र्यांना सांगावे लागले, अंबरनाथमध्येही काँग्रेससोबत युती केली तेव्हाही मुख्यमंत्र्यांना समोर येऊन सांगावे लागले की ही युती नाही. तरीही निर्लज्जपणे अंबरनाथ-बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील एक संशयित आरोपी, तुषार आपटे, ज्याच्याविरोधात मोठा रोष निर्माण झाला होता, त्यांना अटक झाली होती आणि उघडपणे ते संघाचे काम करतात आणि त्यांना तुम्ही निर्दोषत्व सिद्ध न होता

# कल्याण-डोंबिवलीत 'पाकीट' संस्कृती!

## भाजप उमेदवाराकडून ३ हजारांचे वाटप, शिंदे गटाच्या उमेदवाराने डाव उधळला

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला असून, राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सर्वच पक्षांच्या बूथवर कार्यकर्त्यांची नियोजनबद्ध कामे सुरू असतानाच, डोंबिवलीतून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. भाजपने सर्वाधिक जागा बिनविरोध निवडून आणल्याचा दावा केलेल्या या महापालिकेत, आता भाजपच्याच एका उमेदवाराच्या प्रचारार्थ पैशांचे वाटप केल्याचे उघडकीस आले आहे. डोंबिवलीतील तुकाराम नगर परिसरात एका महिलेच्या घरात पैशांची पाकिटे सापडल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली असून निवडणुकीतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या धामधुमीत मतदारांना आपल्याकडे खेचण्यासाठी चक्क रोख पैशांचा वापर केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. डोंबिवलीच्या तुकाराम नगरमधील दशरथ भुवन परिसरात भाजप कार्यकर्त्यांकडून नागरिकांच्या घरी पांढऱ्या रंगाची पाकिटे पोहोचवली जात होती. या प्रत्येक पाकिटात ५०० रुपयांच्या सहा नोटा, म्हणजे ३ हजार रुपये असल्याचे उघड झाले आहे. विशेष म्हणजे, येथील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार नितीन पाटील आणि त्यांच्या दक्ष कार्यकर्त्यांनी या पैसे वाटपाचा छडा लावत संबंधितांना रंगेहाथ पकडले. या घटनेची माहिती मिळताच निवडणूक आयोगाचे भरारी पथक आणि पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.



डोंबिवलीतील या विशिष्ट प्रभागात भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात 'मैत्रीपूर्ण' लढत होत आहे. भाजपचे उमेदवार विशू पेडणेकर आणि शिवसेनेचे नितीन पाटील यांच्यात येथे थेट सामना आहे. महायुती म्हणून एकत्र असणारे हे दोन्ही पक्ष या ठिकाणी एकमेकांविरुद्ध उभे ठाकल्याने मोठी रसाखेच पाहायला मिळत आहे. विशू पेडणेकर यांचे कार्यकर्ते पैसे वाटप करत असल्याचे समोर आल्यानंतर, शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी त्याचे व्हिडिओ बनवून हा डाव उधळला. महायुतीतील दोन प्रमुख घटक पक्षच अशा प्रकारे समोरासमोर आल्याने आणि त्यातही पैसे वाटपाचे आरोप झाल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

---

## शिवसेना ठाकरे गटाच्या निष्ठावंताचा पक्षाला रामराम:दगडू सकपाळ शिंदे गटात

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार दगडू सकपाळ यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. म्हातारा झाल्यावर माणसाची गरज संपते, असे निराशाजनक विधान सकपाळ यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. त्यानंतर त्यांनी आज एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केला आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी दगडू सकपाळ यांनी त्यांच्या मुलीला, रेश्मा सकपाळ यांना उमेदवारी मिळावी अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाकडे केली होती. मात्र, त्यांच्या पदरी निराशा पडली. त्यानंतर सकपाळ नाराज झाले होते. लालबाग, परळ तसेच शिवडी परिसरात



त्यांनी शिवसेनेचे मोठे वर्चस्व निर्माण केले होते. परंतु, पदरी निराशा पडल्याने त्यांनी अखेर शिवसेना ठाकरे गटाला रामराम ठोकला आणि शिंदे गटात प्रवेश केला आहे.

आपले संपूर्ण कुटुंब शिवसेनेत (ठाकरे गट) कार्यरत आहे. अनेक आंदोलनांमध्ये सक्रिय सहभागी झाल्यानंतर आपल्यावर गुन्हे दाखल झाले. पक्षासाठी झोकून काम केले. गेल्या 15 वर्षांमध्ये पक्षाकडे आपण काहीच मागितले नाही. आपल्या हयातीत मुलगी नगरसेविका व्हावी अशी इच्छा होती. त्यामुळे मुलीला उमेदवारी मिळावी, अशी इच्छा व्यक्त केली होती. परंतु पदरी निराशा आली.

शिवसेनेनेच मला मोठे केले. पण इतकी वर्षे सक्रिय सहभागानंतर पक्षाने आपल्याला दणका दिला, अशी खंत दगडू सकपाळ यांनी बोलून दाखवली.

---

## तुमच्या डोक्यावर कोणी नाही म्हणून बेलगाम

### राज ठाकरेंच्या आरोपांवर प्रकाश महाजनांचा घणाघात

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- मुंबई विमानतळ बंद करण्यात येऊन ती जागा हडपण्याचा डाव असल्याची शंका मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना उपस्थित केली होती. राज ठाकरेंनी केलेल्या या आरोपावर आता शिवसेना शिंदे गटाचे प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी पलटवार केला आहे. मुंबईतील सांताक्रुज विमानतळ बंद झाले, ते काय विकले का सरकारने? असा सवाल महाजन यांनी राज ठाकरेंना उद्देशून विचारला आहे.

प्रकाश महाजन म्हणाले, राज ठाकरे यांच्याविषयी पूर्ण आदर ठेवून सांगतो, तुमच्या डोक्यावर कोणी नाही म्हणून तुम्ही असे बेलगाम झाले आहात. मग तुम्ही कशाला





अमित शहा, सोनिया गांधी यांना भेटायला गेले होते. मुख्यमंत्री या पदाचा मान ठेवा, प्रत्येक पक्ष चालवण्यासाठी एक पद्धत असते, असा पलटवार महाजन यांनी केला आहे.

पुढे बोलताना प्रकाश महाजन म्हणाले, मुंबईतील सांताक्रुज एअरपोर्ट बंद झाले, ते काय विकले का सरकारने? कदाचित यांचे व्यवसाय बिल्डर असल्यामुळे त्यांचा डोळा त्या जागेवर असेल. सुगीत संधी की संधीत सुगी ते शोधत आहेत, हे माहीत नाही, असा टोलाही त्यांनी लगावला आहे. बाळासाहेबच ब्रँड होते, त्यांच्या पुढची पिढी बोलताना ब्लँक होते, भविष्यात एक बोलेल उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होतील आणि दूसरा बोलेल राज ठाकरे मुख्यमंत्री होतील, काही सांगता येत नाही.

उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली होती. यावर देखील प्रकाश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, हे राजकीय विधान आहे, असा माझा अनुभव आहे. कोणत्याही ठाकरेला त्यांची चूक दाखवलेली अजिबात आवडत नाही. त्यांना सल्ला दिलेला देखील आवडत नाही. उद्धव ठाकरेंचे हे राजकीय विधान आहे. स्वतःची प्रतिमा सुधारण्यासाठी हे एक चावट विधान आहे.

प्रकाश महाजन यांनी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर देखील टीका केली आहे. ते म्हणाले, जे उद्धवला बोलता येत नाही ते याच्या तोंडात टाकून दिले जाते. आता दोन्ही भावाचा संजय राऊत प्रवक्ता झाला आहे. शिवसेनेच्या वचनाला 2019 मध्ये तडा याचमुळे गेला.

---

## २०१७ चा भाजपचा जाहीरनामा पाहण्याची तसदी घ्यावी

### प्रशासकाच्या माध्यमातून सत्ता असताना काय केले? महायुतीच्या वचननाम्यावर काँग्रेसचा हल्लाबोल

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीकडून 2026 साठीचा वचननामा जाहीर करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत हा वचननामा प्रसिद्ध झाला. यावर आता काँग्रेसने टीका केली आहे. त्यांनी 2017 चा भाजपचा जाहीरनामा पाहण्याची तसदी घ्यावी. 4 वर्षे प्रशासकाच्या माध्यमातून थेट सत्ता असताना काय केले? असा सवाल सचिन सावंत यांनी उपस्थित केला आहे.

सचिन सावंत यांनी ट्विट करत म्हटले, गेले दोन महिने हिंदू मुस्लिम, हिंदू मुस्लिम केल्यानंतर प्रचार संपण्याच्या दोन दिवस आधी महायुतीने आपला जुमलानामा जाहिर केला आहे. मुख्यमंत्री म्हणतात की त्यांचा ट्रॅक रेकॉर्ड चांगला आहे. मग त्यांनी 2017 चा भाजपचा जाहिरनामा पाहण्याची तसदी त्यांनी घ्यावी. चार वर्षे प्रशासकाच्या माध्यमातून थेट सत्ता असताना काय केले? हा आमचा प्रश्न आहे. यातील काही आश्वासने आम्ही आठवण करून देत आहोत. 11 लाख घरे, आणि छत्रपती शिवाजी महाराज आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या





स्मारकांचे काय झाले? अजून काही भाजपच्या हायलाइट्स आम्ही लवकरच जाहिर करु, असे सावंत यांनी म्हटले आहे.

पुढे सचिन सावंत म्हणाले, मुख्यमंत्री हे "सपनों के सौदागर" म्हणजे स्वप्नांचे व्यापारी आहेत. त्यामुळे सोनेरी भविष्याचे रंग दाखवताना वर्तमान किती काळा आहे हे सांगत नाहीत. त्यांच्या सर्व मुलाखतीतून भविष्यातील संकल्पना सांगतात पण आतापर्यंतची आश्वासनांचे काय झाले हे सांगत नाहीत. ईस्टर्न फ्री वे 2017 साली ठाण्याला जोडण्यात येणार होते. पूरमुक्त मुंबई 2017 साली आश्वासन होते ते आश्वासन आजही आहे. मुख्यमंत्री जी तारीख देतात ती कधीच पूर्ण होत नाही. तारीख पर तारीख हा डायलॉग मुख्यमंत्र्यांकडून घेतला असावा. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था 1 ट्रिलीयन डॉलर होणार यासाठी 2019 पासून वेगवेगळ्या तारखा देत आले. अद्याप जवळपासही पोहोचलो नाही. एलेव्हेटेड रोडचे काय झाले? बांगलादेशी-रोहिंग्या सर्वात जास्त शोधून काढले असे मुख्यमंत्री म्हणतात मग आकडेवारी जाहीर करा, असे आव्हान सावंत यांनी केले आहे.

## मंत्री नितेश राणेंच्या निवासस्थानाबाहेर संशयास्पद बॅग

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री आणि भाजप नेते नितेश राणे यांच्या मुंबईतील 'सुवर्णगड' या निवासस्थानाबाहेर एक संशयास्पद बेवारस बॅग आढळल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या बॅगेमुळे घातपाताचा प्रयत्न असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, मंत्र्यांच्या निवासस्थानासारख्या संवेदनशील ठिकाणी अशा प्रकारे बेवारस वस्तू सापडल्याने सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने परिसराची नाकेबंदी केली असून कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे. संशयास्पद बॅगेची



सध्या तज्ज्ञ पथकांकडून कसून तपासणी केली जात असून, यात एक चिठ्ठी आढळून आली आहे. त्यात 'प्लीज टेक फ्री शूज अँड क्लोथ्स' असे लिहिल्याचे आढळून आले.या घटनेचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून त्याआधारे संशयितांचा शोध सुरू केला आहे. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, पोलिस सर्व तांत्रिक बाबींची कसून चौकशी करत आहेत.

---

## मुंबई झोपडपट्टी मुक्त करणार:बेस्ट बसच्या तिकीटात महिलांना ५० टक्के सूट; महापालिकेसाठी महायुतीचा वचननामा जाहीर

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- मुंबई महापालिकेसाठी महायुतीकडून वचननामा जाहीर करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच भाजप व शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी मुंबईमधल्या मराठी माणसांसाठी तसेच येथील गिरणी कामगारांसाठी हक्काचे घर तयार करणार असल्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच लाडक्या बहिणींना बेस्ट बसच्या तिकीटात 50 टक्के सूट देण्याचे आश्वासन महायुतीच्या वचननाम्यातून देण्यात आले आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबईत असलेल्या मराठी माणसाच्या हिताचे आणि मराठी भाषेचे रक्षण करणे आणि वाढवणे ही आमची जबाबदारी आहे आणि आमचे वचन देखील आहे. तसेच मुंबईच्या बाहेर गेलेला मराठी माणूस हा मुंबईच्या बाहेर गेला, याला जबाबदार कोण? मुंबईत मराठी माणसाला परत आणण्याची देखील आमची जबाबदारी आहे.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, महायुती सरकारने मोठे निर्णय घेतले आहेत. 20 हजार इमारतींना ओसी देण्याचा निर्णय आम्ही घेतला असून याची अंमलबजावणी पुढील एक वर्षात केली जाईल. झोपडपट्टी मुक्त मुंबई हे शिवसेना प्रमुखांचे स्वप्न होते. 40 लाख लोकांना घर देणे. परंतु, मागच्या अनेक वर्षात काहीच झाले नाही. वारसा सांगणाऱ्यांची ती जबाबदारी होती. परंतु आता आम्ही ते पूर्ण करणार आहोत. सुनियोजित मुंबईचा विकास करण्याचे आमची



जबाबदारी असून ती आम्ही या वचननाम्यातून करणार आहोत. गिरणी कामगारांना हक्काचे घर देण्याचे आम्ही काम सुरू केले आहे. आतापर्यंत 12 हजार लोकांना घरे दिली आहेत. देशाच्या पंतप्रधानानांनी देखील घोषणा केली आहे की सर्वांसाठी घरे यानुसार आम्ही काम करत आहोत. मुंबईतला माणूस हा बाहेर जाऊ नये आणि बाहेर गेलेला पुन्हा यावा, यासाठी आमचे प्रयत्न आहेत.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबई महाराष्ट्रापासून तोडली जाईल, अशी टीका विरोधक आमच्यावर करत असतात. पण पंतप्रधान मोदींनी मुंबईला फार महत्त्व दिले आहे. मुंबईला फीनटेक सीटी करण्याचा निर्धार आमचा आहे. बीकेसीला इंटरनॅशनल फायनान्स सर्व्हिस सेंटर, स्टार्टअप हब उभारले जाणार आहेत. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरेंचे जन्मशताब्दी वर्ष असून महापालिकेच्या माध्यमातून आम्ही विविध उपक्रम राबवणार आहोत. हिंदूहृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय विद्यापीठ महापालिकेच्या रुग्णालयांना संलग्न करण्याचा आमचा मानस आहे. बेस्ट बसच्या तिकीटात लाडक्या बहिणींना 50 टक्के सवलत, लघु उद्योजकांना 5 लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज, कोळीवाडा आणि गावठाण यांचे स्वतंत्र डीसीआर तयार करून पुनर्विकास, पुनर्विकास प्रकल्प राबवताना जी काही अडथळे येत होती.

१ २ ३ ४ ५ ६